म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०७९

# देशाची हांक

लक्ष्मण जनार्दन खरे

REFBK-0012325

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

# देशाची हांक

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय
नवुक्रम 64402 वि: निबंध
वाक 2068 नों: दि: 9913/09

10निबंध
64402
991309
2068

दा. क्र. 92324

लक्ष्मण जनार्दन खरे

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

REFBK-0012325

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

महाराष्ट्र ग्रंथ भांडार
महाद्वार रस्ता कोल्हापूर.

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

पहिली आवृत्ति

मुद्रक
गो. वा. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय
१६७ बी, विद्यापीठ
कोल्हापूर.

प्रकाशक
गो. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
महाद्वार रस्ता
कोल्हापूर.

किंमत ७५ न. पैसे

मित्र हो ! आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून चौदा वर्षें पुरीं झालीं व लोकसत्ताक राज्य होऊन देखील बारा वर्षें झालीं. लोकांच्या हातीं सर्व अधिकार आले, पण सर्व लोक अजून सुखासमाधानांत नांदू लागले नाहींत. याचें कारण काय असावें बरें ? स्वातंत्र्यासारखें सुख नाहीं, लोकमताप्रमाणें ज्या देशांत राज्यकारभार चालतो, त्या देशांत सर्व प्रकारचें सुख लोकांना लाभतें, अशा गोष्टी आपण ऐकत आलों आणि त्या अगदीं खऱ्याहि आहेत. असें असून आपल्याला संतोष, समाधान कां वाटत नाहीं असा विचार माझ्याप्रमाणें तुमच्या मनांत वारंवार येत असेल. या प्रश्नाचें उत्तर मनाला पटण्याजोगें जेव्हां आपल्याला मिळेल व त्या उत्तराप्रमाणें आपण वागावयास लागूं तेव्हांच आपल्याला स्वातंत्र्याचीं व लोकशाहीचीं गोड फळें चाखतां येतील.

आपल्या देशाचा कारभार आपल्या हातीं आहे, तेव्हां आपल्या अडचणी आपल्यालाच दूर करावयास हव्या. तसेंच त्या अडचणींच्याबद्दल दुसऱ्या कोणाला दोष द्यायला मुळींच जागा नाहीं. या दोन गोष्टी नीट

ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. मगच आपल्याला पडलेल्या कोड्याचा नीट उलगडा होईल.

या दृष्टीनें विचार करून मला जें वाटतें तें या छोट्या पुस्तकांत मी लिहून काढलें आहे. माझ्या देश-बांधवांस तें पटलें, तर त्याप्रमाणें ते वागतील. त्यामुळें त्यांना स्वतःला समाधान लाभेल व त्यांचें उदाहरण पाहून इतरहि त्याप्रमाणें वागूं लागले म्हणजे सर्व लोकांस सुख लागून आपल्या देशांत कल्याणकारी राज्य नांदू लागेल. तो सोन्याचा दिवस लवकरच उगवो अशी ईश्वराची प्रार्थना करितों.

दर्यापूर, जिल्हा अमरावती
गुडीपाडवा
शके १८८४

ल. ज. खरे

५८/१९६२

92324

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. लक्ष्मण जनार्दन उपाख्य भाऊसाहेब खरे हे दर्यापूरचे एक ज्ञानवृद्ध आणि तपोवृद्ध असे नामवंत वकील आहेत. आणि त्यांचें 'खरे' हें कुलनामहि त्यांनीं आपल्या सचोटीच्या आणि नेकीच्या व्यवहारानें अन्वर्थक करून दाखविलें आहे.

आजच्या दर्यापुराच्या जनकत्वाचा मान यथार्थत्वानें भाऊसाहेबां-कडेच जाईल. दर्यापूरमधील सहकारी बँक, प्रबोधन विद्यालय, वाचनालय, संघशाखा, रिक्रीएशन क्लब इत्यादि अनेक संस्था भाऊसाहेबांनीं अपत्यनिर्विशेष प्रेमानें वाढविल्या व जोपासल्या. त्यांचें घर म्हणजेहि एक सार्वजनिक संस्थाच आहे. गांवांत कोणीहि तडी-तापडी दैन्यवाणा येवो, कथा किर्तनकार—प्रवचनकार येवो, कोणीहि कोणतेंहि सार्वजनिक काम घेऊन येवो, भाऊसाहेबांचें घर म्हणजे सर्वांचें प्रेमाचें व हक्काचें माहेरघरच ! त्यांच्या घरून कोणीहि कधीहि विन्मुख होऊन जाणार नाहीं. कोणाचा हेवादावा नाहीं, कोणाचा द्वेषमत्सर नाहीं. अशी त्यांची अजातशत्रुवृत्ति आहे.

"प्रियप्रायावृत्तिर्विनयमधुरो वाचि नियमः ।
प्रकृत्या कल्याणी मतिरनवगीतः परिचयः ॥"

हें भवभूतीचें सत्पुरुषाचें वर्णन भाऊसाहेबांना अक्षरशः लागू पडतें.

पण अशा प्रकारें भाऊसाहेबांना कोणी 'महापुरुष' म्हणून ठरवूं किंवा संबोधूं लागला तर तें त्यांना मनापासून रुचत नाहीं. ते म्हणतात, 'मी दर्यापूरचा एक सर्वसामान्य नागरिक आहे आणि उत्तम नागरिक होण्याचा मी सतत प्रयत्न करीत आहे.' आणि ह्या त्यांच्या उक्तींतच त्यांच्या जीवनाचें रहस्य सांठविलेलें आहे. आज

सर्वत्र वाक्पांडित्य गाजविणाऱ्या वाचिवीरांचा सुळसुळाट झाला आहे. आंगचोरपणा, कामचुकारपणा, चालढकलपणा सर्वत्र बोकाळला आहे. साहजिकच अशा ह्या कृतिशून्यतेमुळें जीवनांत सर्वत्र उथळपणा, पोकळपणा व दंभ दिसून येत आहे आणि त्यांतूनच स्वैराचार, भ्रष्टाचार व वैफल्य जन्मास येत आहेत. सारा जीवनप्रवाहच कुंठित आणि गढूळ होऊन गेला आहे. सहस्रमार्गांनें समाजाचा होणारा हा विनिपात वेळींच थांबविल्याशिवाय नवभारताची संकल्पित उभारणी सिद्धीस कशी जाणार ?

ह्या भाऊसाहेबांच्या तळमळींतूनच प्रस्तुत ग्रंथाचा जन्म झाला आहे. नुसता पोकळ पुढारीपणा मिरविण्यापेक्षां प्रसिद्धिविन्मुख लोक-शिक्षकाचा पेशा त्यांना मनापासून आवडतो. भाऊसाहेब धंद्यानें वकील असले तरी त्यांचा पिंड जातिवंत शिक्षकाचा आहे. कोणताहि कठीण विषय सुलभ करून सांगण्याची त्यांची हातोटी विशेष असल्यामुळें विद्यार्थीवर्ग त्यांच्याकडे सहजच आकर्षिला जातो. ह्या विद्यार्थिवर्गाला त्याच्या जीवनांत उपकारक व मार्गदर्शक ठरतील अशीं कांहीं आचारविचारांचीं सूत्रें भाऊसाहेबांनीं स्वतःच्या चिंतनां-तून व अनुभवांतून काढलीं व तींच प्रस्तुत पुस्तकाच्या रूपानें ग्रथित केलीं आहेत. पुस्तकांतील भाषा समजण्याला अगदीं साधी व सोपी असून वाक्यरचना सुटसुटीत व घरगुती आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटीं उपयुक्त टीपाहि दिल्या आहेत. साहजिकच शाळेंत पाठ्य-पुस्तक ( टेक्स्ट ) म्हणून लावण्यासारखें हें पुस्तक झालें आहे.

नवीन भारताची घडण चालू आहे. भारताचा नवीन इतिहास तयार होत आहे. पंचवार्षिक योजनांनीं भारताचें बाह्य भौतिक स्वरूप पालटत आहे. ‘ सुजलां–सुफलां–सस्यश्यामलाम् ’ अशी आपली

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

भारतभूमि आपण बनविणार आहों. पण भारतमातेचें हें चढतें वाढतें वैभव आणि ऐश्वर्य पेलून धरण्यास लागणारें महान् आंतरिक सामर्थ्य जर तरुण पिढींत असणार नाहीं तर गुलामगिरीच्या आणि लाचारीच्या मागील इतिहासाचीच पुनरावृत्ति होणें अपरिहार्य ठरेल. म्हणून भाऊसाहेबांनीं तरुण पिढीला देशाच्या नांवानें हांक दिली आहे. ती हांक ऐकून विद्यार्थीवर्ग कर्तव्यतत्पर व सेवापरायण बनावा हीच त्यांची अपेक्षा आहे.

स्वातंत्र्य-प्राप्तिपूर्वीच्या काळांत देशासाठीं कांहींतरी केलें पाहिजे अशा उज्ज्वल ध्येयनिष्ठेनें तरुणांचीं जीवनें भारलीं गेलीं होतीं. पण आतां फॅशनबाजी, क्षुद्र स्वार्थ, हेवेदावे, सत्ताधिकाराची लालसा ह्यांनीं त्यांचीं जीवनें भारलीं जात आहेत. अशा वेळीं साध्या राहणीनें व उच्च विचारसरणीनें आपलें जीवन जगून, आपल्या आवडीच्या कोणत्याहि क्षेत्रांत यावच्छक्य ती देशसेवा करीत राहणें हें आपलें परम पवित्र कर्तव्य आहे असें भाऊसाहेब सांगत आहेत.

" प्रत्यहं प्रत्यवेक्षेत, नरश्चरितमात्मनः ।<br>
किं नु मे पशुभिस्तुल्यं, किं नु सत्पुरुषैरिति ॥ "

—— आपली कोणती कृति सज्जनांना आनंद देणारी होते आणि कोणती कृति पशुतुल्य होते, ह्याचा विचार तरुणांनीं क्षणाक्षणाला करावा आणि आपल्या उज्ज्वल सच्चरितानें भारताचा नवीन सुंदर इतिहास घडवावा असा प्रस्तुत ग्रंथाचा संदेश आहे.

प्रबोधन विद्यालय<br>
दर्यापूर,<br>
रामनवमी, शके १८८४

मामा क्षीरसागर

## अनुक्रम


१ आपला देश .... .... १

२ चुकलें कोठें .... .... ७

३ देशावरील प्रेम .... .... ११

४ साधी राहाणी व उच्च विचारसरणी .... १६

५ सचोटी .... .... .... २२

६ सहकार .... .... .... २९

७ सहिष्णुता .... .... .... ३६

८ सतत उद्योग .... .... ४३

९ उपसंहार .... .... .... ५१


शुद्धिपत्र : पान १२ ओळ ११ मध्यें ‘ बाजी फसलकर ’ त्याऐवजीं ‘ बाजीप्रभु देशपांडे ’ असें वाचावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम. ४५५०२ दि: १.१.१९७३
क्रमांक २०७८ नों: दि:

.... १

# आपला देश

**या** पुस्तकाचें नांव 'देशाची हांक' असें आहे. आपला देश केवढा आहे, कसा आहे, यांत कोण कोण राहतात, त्यांच्या भाषा किती आहेत, याची निदान ढोबळ कल्पना प्रत्येकाला हवी. तशी नसेल तर देशाची हांक या शद्बाचा नीट अर्थ त्याच्या ध्यानांत येणार नाहीं. म्हणून ती माहिती अगदीं थोडक्यांत या प्रकरणांत दिली आहे.

आपल्याकडे आगगाड्या सुरू होऊन शंभर वर्षें झालीं. त्यापूर्वी बहुतेक प्रवास बैलगाड्यांनीं किंवा घोड्यावरून करावा लागे. त्यासाठीं सुद्धां चांगले बांधलेले रस्ते फारसे नव्हते. त्यामुळें प्रवास करणें फार कठीण होतें व प्रवास करणारे लोकहि फार कमी असत. आपल्या राहत्या गांवाच्या आजूबाजूच्या पांचपंचवीस कोसांतील गांवांची

माहिती असणारेच बहुतेक. यामुळें सर्वसाधारण लोकांची देशाची कल्पना फार आकुंचित असे. आपली बोली जेथपर्यंत बोलली जाते तेवढाच आपला देश असें मानण्याकडे लोकांचा कल असे. पूर्वकाळच्या स्वयंवरांच्या वेळीं किंवा अश्वमेधासारख्या मोठ्या यज्ञांच्या प्रसंगीं 'छपन्न देशींचे राजे जमले होते' अशीं वर्णनें आपण जुन्या ग्रंथांतून वाचतों. सर्व भारत हा एक देश आहे ही कल्पना साधारण जनतेच्या ध्यानींमनींहि नव्हती..

परंतु आतां हें बदललें आहे. आगगाड्या, मोटारी, सोईस्कर सडका यांमुळें दळणवळण सुलभ झालें आहे. प्रवास करणाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे, व त्यांचे प्रवास दूरदूरपर्यंत होऊं लागले आहेत. देशासंबंधीच्या आपल्या जुन्या आकुंचित कल्पना जाऊन आपला देश केवढा आहे याची थोडीबहुत कल्पना साधारण माणसास येऊं लागली आहे.

जगांतल्या फार मोठ्या देशांपैकीं आपला देश आहे. विस्ताराच्या मानानें आपल्या देशाहून मोठे असे पांच सहाच देश असतील. लोकसंख्येच्या मानानें पाहिलें तर आपल्या देशापेक्षां जास्त लोक फक्त चीन देशांत आहेत. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी यांसारख्या पुढारलेल्या देशांची लोकसंख्या आपल्या देशापेक्षां पुष्कळ कमी आहे. क्षेत्रफळानें म्हणजे लांबीरुंदीच्या मानानें दहाच्या आंत नंबर असलेला व लोकसंख्येंत दुसरा नंबर असलेला आपला देश आहे. ही एक प्रकारें अभिमानाची गोष्ट आहे. परंतु विस्तार व लोकसंख्या लक्षांत घेतां आपल्या देशाची जितकी भरभराट व्हावयास पाहिजे तितकी मुळींच झालेली नाहीं. तसेंच जगांमध्यें आपल्या देशाला जें मानाचें स्थान असलें पाहिजे तेंहि नाहीं. म्हणून आपला

देश जणू काय आपल्याला सांगत आहे कीं " माझ्या आकाराला व तुमच्या संख्येला शोभेल अशी मान्यता व भरभराट मला मिळवून द्या."

आपला देश उत्तरेकडून दक्षिणेकडे चिंचोळा होत गेला आहे. उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत त्याची लांबी सुमारें दोन हजार मैल आहे. राजस्तानपासून आसामपर्यंत त्याची जास्तीत जास्त रुंदी सुमारें सतराशें मैल आहे. देशाची लोकसंख्या चाळीस कोटीच्या घरांत गेली आहे. जगांतले आजचे तीन बलाढ्य देश म्हणजे अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें, रशिया व इंग्लंड या तिन्ही देशांत मिळून जितके लोक आहेत तितके जवळ जवळ आपल्या एका देशांत आहेत !

आपल्या देशांत अनेक भाषा आहेत. म्हणून कारभाराच्या सोयीसाठीं त्यामध्यें भाषावार निरनिराळीं राज्यें करण्यात आलीं आहेत. परंतु महत्त्वाच्या बाबतींत सर्व देशाचा कारभार दिल्लीच्या संसदेच्या ( पार्लमेंटच्या ) कायद्याप्रमाणें चालतो.

भारत वर्ष ( इंडिया ) या नांवानें आपला देश शेंकडो वर्षांपासून जगाला माहीत आहे. तथापि अनेक भाषा, अनेक धर्म, प्रत्येक धर्मांत अनेक पंथ व सर्व धर्मांमध्यें जास्त अनुयायी असलेल्या हिंदू धर्मांतील शेंकडो जाती यांमुळें या देशांतील लोकांमध्यें आपण एका देशाचे नागरिक आहोंत ही भावना शंभर वर्षांपूर्वीं अत्यंत कमी प्रमाणांत होती. सव्वाशें वर्षांपूर्वीं इंग्रजांनीं आपला देश संपूर्ण जिंकला व सगळीकडे आपला अंमल बसविला. तेव्हांपासून ही भावना हळू हळू सर्वसाधारण लोकांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली. त्यानंतर आपल्या देशांत राजकीय चळवळ सुरू झाली. तिच्या योगानें आपण

सर्वजण एकाच देशाचे नागरिक आहोंत व आपणा सर्वांचे हितसंबंध एक आहेत असें लोकांच्या ध्यानांत येऊं लागलें. दादाभाई नवरोजी न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक, अरविंद घोष, महात्मा गांधी या थोर व्यक्तींच्या प्रयत्नांनीं भारतीय तेवढा एक हा विचार गेल्या शंभर वर्षांत सामान्य लोकांपर्यंत जाऊन पोंचला आहे.

आतां एखाद्याच्या मनांत येईल कीं, भारत एवढा मोठा चाळीस कोटी लोकांचा देश, त्यांतला एक मी. माझ्याच्यानें काय होणार? देश मला बापड्याला हांक ती काय मारणार, आणि मी त्याला ओ दिली तरी काय होणार, व न दिली तरी काय होणार? परंतु अशा प्रकारें विचार करणें चूक आहे. असा विचार जर प्रत्येकजण करूं लागला, तर देशाची प्रगति कशी होणार? म्हणून प्रत्येकानें असें समजलें पाहिजे कीं, मी कितीहि लहान असलों, तरी माझ्या देशासंबंधानें माझें कांहीं कर्तव्य आहे व तें मी पार पाडलेंच पाहिजे. तें जर मी पार पाडलें नाहीं, तर त्यामुळें सबंध देशाचें कांहीं ना कांहीं नुकसान होईल.

अशी एक गोष्ट सांगतात कीं प्रजेमध्यें प्रामाणिकपणा किती आहे हें समजून घेण्याची एका राजाला इच्छा झाली. म्हणून त्यानें हुकूम काढला कीं पुढील अमावास्येच्या रात्रीं प्रत्येक नागरिकानें राजधानी-च्या मध्यभागीं ठेवलेल्या मोठ्या पिपांमध्यें निर्भेळ दुधाचा एक एक लोटा आणून ओतावा. पिपांच्या आसपास दिवे ठेवले नव्हते. लोकांनींहि दिवे न घेतां झांकलेल्या लोट्यांतून दूध आणावें अशी राजाज्ञा होती. स्वतःला हुशार समजणाऱ्या एका मनुष्याच्या मनांत आलें कीं मी एकानें दूध न टाकतां पाणी टाकलें तर तें कोणास

समजणार? इतक्या दुधांत माझें लोटाभर पाणी सहज मिसळून जाईल व तें कोणाच्या लक्षांत येणार नाहीं. असा विचार करून दुधाऐवजीं लोटाभर पाणी त्यानें पिपांत नेऊन ओतलें. दुसऱ्या दिवशीं राजाला दिसलें कीं सर्व पिपांमध्यें चोवीस हिस्से पाणी व एक हिस्सा दूध असें मिश्रण जमलेलें आहे. बहुतेक माणसांनीं त्या हुशार मनुष्याप्रमाणें युक्तिवाद केला व परिणामीं पिपांमध्यें दुधाऐवजीं बहुतेक पाणीच येऊन पडलें. तात्पर्य, कोणीहि समजूं नये कीं मी एकानें देशाकरितां कांहीं न केलें तरी चालेल. 'थेंबें थेंबें तळें साचे' ही म्हण देशाच्या भरभराटीलाहि लागू आहे. कामचुकार व अंगचोर लोकांचा देश केव्हांहि भरभराटीस येणार नाहीं.

आपला देश मोठा आहे. तसाच तो ईश्वरानें चांगला समृद्ध असा निर्माण केला आहे. त्यांत सिंधू, रावी, सतलज, गंगा, यमुना, नर्मदा, कृष्णा, गोदावरी अशा मोठमोठ्या नद्या आहेत. त्यांच्यांतून कालवे काढले आहेत. जमीन पुष्कळशी सुपीक आहे. कोळसा, लोखंड, मँगानीजच्या खाणी आहेत. तसेंच रॉकेलहि कांहीं भागांत आणखी सांपडेल असें वाटत आहे. बांधकामाच्या उपयोगी वृक्ष व औषधांसाठीं उपयोगी वनस्पति अरण्यांत विपुल आहेत. बहुतेक प्रकारचीं पिकें व नाना जातीचीं फळें आपल्या देशांत होऊं शकतात. तीन बाजूंनीं समुद्र असल्यामुळें मासळीचें उत्पन्नहि पुष्कळ होऊं शकेल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोक बुद्धिमान आहेत. इतक्या सगळ्या गोष्टी अनुकूल आहेत. इतक्या उपर आपल्या देशाचा उत्कर्ष जर आपण साधला नाहीं, तर आमच्यासारखे अभागी आम्हीच!

## टीपा

स्वयंवर : एखाद्या राजाला आपल्या मुलीचें लग्न करावयाचें असल्यास तो आजूबाजूच्या विवाहेच्छू राजांना व राजपुत्रांना बोलावणीं पाठवी. ठरलेल्या दिवशीं ते जमले, म्हणजे राजाचे मुलीनें त्यांना पाहून व त्यांचें वर्णन ऐकून एखाद्यास पसंत करावयाचें, व राजानें त्यांच्याशीं राजकन्येचें लग्न लावून द्यायचें, या लग्नपद्धतीचें नांव स्वयंवर.

अश्वमेध : सार्वभौम ( सर्व भारत देशाचा राजा ) होऊं इच्छिणारा राजा एक घोडा सोडून त्याच्याबरोबर सैन्य पाठवी; तो घोडा ज्या राज्यांत जाईल त्याच्या राजानें घोडा सोडणाऱ्या राजाला सार्वभौम मानावें किंवा लढाईला उभे रहावें; अशा रीतीनें देशभर फिरून सैन्याचा सर्वत्र जय होऊन घोडा परत आला म्हणजे राजा एक यज्ञ करून आपण सार्वभौम झाल्याचें जाहीर करी. या यज्ञाला अश्वमेध म्हणत.

संसद : देशाचा कारभार चालविणारी लोकांनीं निवडून दिलेल्या लोकांची सभा.

अनुयायी : ( एखाद्याच्या ) मागें जाणारे म्हणजे त्याला मानणारे.

भावना : आवड, नावड, राग द्वेष इत्यादि मनाच्या निरनिराळ्या अवस्था.

प्रगति : पुढें पुढें जाणें, सुधारणा.

कर्तव्य : केलेंच पाहिजे असें काम.

उत्कर्ष : भरभराट.

♣ ♣ ♣

....२

# चुकलें कोठें ?

मागील प्रकरणांत आपल्या देशाचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. तें वाचल्यावर सहजच आपल्या मनांत येतें कीं इतक्या अनुकूल गोष्टी असून आम्हाला सुख कां लागत नाहीं, आणि आम्हाला हांक मारण्याची गरज देशाला कां वाटावी ? आपल्या देशांत समृद्धीचीं साधनें पुष्कळ आहेत. शिवाय आमच्यामध्यें श्रीराम, श्रीकृष्ण यांसारखे अवतारी पुरुष झाले; भगवान् बुद्ध, भगवान् महावीर, श्रीशंकराचार्य असे धर्मप्रवर्तक झाले; आणि साधुसंतांची वाण तर आमच्या देशांत कधींच नव्हती, व आजहि नाहीं. मग आमचा देश परक्यांच्या गुलामगिरींत शेकडों वर्षें कां कुजत राहिला ?

वरील प्रश्न अगदीं बरोबर आहे, आणि त्याचें योग्य उत्तर मिळणें अगदीं अवश्य आहे. इतकेंच नव्हे तर तें उत्तर मिळालें

म्हणजे यापुढें आपल्याला कसें वागलें पाहिजे, देशाची आपल्या संबंधानें काय अपेक्षा आहे हेंहि समजून येईल.

आपला देश आवाढव्य आहे. एवढ्या मोठ्या देशांत रहाणाऱ्या लोकांचीं मनेंहि तितकींच मोठीं पाहिजेत. नाहीं तर ते सुस्थितींत राहूं शकणार नाहींत. आपल्या देशाचें असेंच झालें. देश मोठा असल्यामुळें त्यामध्यें अनेक राज्यें स्थापन झालीं. त्यांच्यामध्यें आपसांत चुरशी उत्पन्न झाल्या. दळणवळणाच्या सोयी नव्हत्या; त्यामुळें निरनिराळ्या राज्यांतील लोकांचा एकमेकांशीं फारच थोडा संबंध येत असे. त्याचा परिणाम झाला कीं आपणा सर्वांचा एक देश आहे, व आपण सर्व देशबांधव आहों ही जाणीव लोकांमध्यें उत्पन्न झाली नाहीं. देशाची चांगली स्थिति रहाण्यासाठीं ही भावना देशांत रहाणाऱ्या सर्व लोकांच्या मनांत नेहमीं जागी असली पाहिजे. पण आपण सर्व देशबांधव आहों हें आपण भारतांतातील सर्व रहिवासी विसरून गेलों. मोठमोठे राजे व त्यांच्या पदरीं असलेले मोठमोठे प्रधान व पंडित यांचेंहि या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें. यामुळें या सुपीक देशावर चालून आलेल्या परकी सैन्यांनीं एक एक राज्य क्रमाक्रमानें जिंकून घेतलें.

महाभारतांत एक कथा आहे. कौरव व पांडव हे चुलत भाऊ होते. परंतु राज्याच्या वाटणीवरून त्यांचें एकमेकांशीं वैर आलें. पुढें एका वेळीं कौरवावर गंधर्वांनीं हल्ला केला व त्यांना कैद केलें. त्या वेळीं पांडवांपैकीं सर्वांत वडीलबंधू धर्मराज यानें आपला पराक्रमी भाऊ अर्जुन याला सांगितलें की कौरवांच्या मदतीस जाऊन त्यांना सोडव. तेव्हां अर्जुन म्हणाला “ या कौरवांनीं आम्हांस अन्यायानें वागविलें आहे. मग त्यांच्या साह्यासाठीं

आपण कां जावें ? ” त्यावर धर्मराजानें अर्जुनाला म्हटलें, “ बाळ, अर्जुना ! एकमेकांशीं भांडतांना आम्ही (पांडव) पांच असूं व ते (कौरव) शंभर असतील. परंतु परक्यांपाशीं जर युद्धाची पाळी आली तर आपण एकशेंपांच असलें पाहिजे ” म्हणजे परक्यांनीं जर कोणावरहि हल्ला केला तर आपण सर्वांनीं मिळून त्याला तोंड दिलें पाहिजे. अर्जुनाला हें सांगणें पटलें व त्यानें पराक्रम करून आपल्या चुलत भावांना शत्रूंपासून सोडविलें.

धर्मराजाचा हा उपदेश भारतांतील राजे लोकांनीं व त्यांच्या प्रधानांनीं व सेनापतींनीं ध्यानांत ठेवून वागावयास पाहिजे होतें. परंतु दुर्दैवानें तसें झालें नाहीं. शेजारच्या राज्यावर परक्यांनीं आक्रमण केलें, तेव्हां ते त्यांच्या मदतीस गेले नाहींत. कित्येकांनीं तर आपल्याशीं चुरस करणाऱ्या राजाचा पाडाव करण्यासाठीं परक्यांना स्वाऱ्या करण्यास आमंत्रणें दिलीं. याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. सुवर्णभूमि म्हणून इतर देशांनीं नांव दिलेला आपला सोन्यासारखा देश परक्यांच्या ताब्यांत गेला आणि देशाची ती लाजिरवाणी व दुःखद अवस्था सुमारें एक हजार वर्षें राहिली !

सुदैवानें आज आपण त्या अवस्थेंतून बाहेर पडलों आहों. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून अभिमानानें आपण जगांत वावरतों आहों. हें स्वातंत्र्याचें अमूल्य रत्न पुन्हा आपल्या हातून कोणी हिरावून घेतां कामा नये. यासाठीं धर्मराजाचा वरील उपदेश आपण हृदयावर कोरून ठेवूं या.

## टीपा

समृद्धि : पुष्कळपणा, चंगळ, उपयुक्तवस्तूंचा खूप मोठा साठा.

महाभारत : संस्कृतभाषेंतील एक फार मोठें पुराण. याचे एक लक्ष श्लोक आहेत. यांत कुरूवंशाचा ( कौरव पांडवांचा ) इतिहास दिला आहे. धर्म, नीति, राज्यकारभार, व्यवहार या विषयांवर त्यामध्यें अनेक प्रकरणें आहेत. सुप्रसिद्ध भगवद्गीता त्यांतच सांगितली आहे.

♣ ♣ ♣

.... ३

# देशावरील प्रेम

तेव्हां देशाची पहिली हांक अशी आहे कीं "बाबांनों! इतक्या वर्षांनीं मला स्वातंत्र्य मिळालें आहे. तें आतां जाऊं देऊं नका." स्वतंत्र असल्याशिवाय कोणाहि देशाची भरभराट होऊं शकत नाहीं. देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्यासाठीं आपण कोणताहि त्याग करण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे. देशावर मनापासून प्रेम करणारे लोकच देशासाठीं हालअपेष्टा भोगतील, व तशीच वेळ येईल तर प्राणहि अर्पण करितील. देशावर प्रेम करणें हें आपलें प्रथम कर्तव्य आहे.

प्रेम किंवा भक्ति ही गोष्ट आपल्याला नवीन नाहीं. आई मुलावर प्रेम करिते, भक्त देवावर प्रेम करितो, आपल्या धर्मावर सर्वजण प्रेम करतात, भाऊ भावावर प्रेम करतो आणि पुष्कळदां सेवक आपल्या धन्यावर प्राणापलीकडे प्रेम करितात. पुत्रप्रेम, बंधुप्रेम,

देवभक्ति, धर्मनिष्ठा स्वामिभक्ति या सर्व भावना पवित्र आहेत व त्या आपल्या मनांत वागल्या पाहिजेत, असें सर्वजण कबूल करतील. मुलासाठीं आई किती कष्ट सोसते ! देवाला प्रसन्न करण्यासाठीं मनुष्य आपल्या सुखावर आणि संसारावर सुद्धां लाथ मारतो. धर्मासाठीं मरण पतकरणाऱ्या लोकांबद्दल आपल्याला अतोनात आदर वाटतो. रामलक्ष्मणासारखें भावाभावांमधील प्रेम आपल्याला पुष्कळदां पहावयास मिळतें. तें पाहून आपण त्यांना धन्यवाद देतों. धन्यासाठीं प्राण देणाऱ्या चाकरांच्या गोष्टी ऐकून आपण मान डोलावितो. आपण इतिहासांत वाचतों कीं, पन्ना दाईनें आपल्या तान्ह्या धन्याचा प्राण वाचविण्याकरितां आपल्या पोटच्या गोळ्याचा बळी दिला. बाजी फसलकरानें शिवाजी महाराज सुरक्षित ठिकाणीं पोंचावे म्हणून हातावर शीर घेऊन लढाई केली, व मरण पतकरलें. चाफाजी टिळेकर धन्याचा प्राण वाचविण्यासाठीं नारायणराव पेशवे व त्याचे मारेकरी यांच्यामध्यें पडला व जिवास मुकला. अशा स्वामिभक्तांचा आपण गौरव करितों.

धर्मनिष्ठा, स्वामिभक्ति इत्यादि गुणांप्रमाणें देशभक्ति देखील सर्वांच्या मनांत बाणली पाहिजे. मागें सांगितल्याप्रमाणें देशाबद्दलची कल्पना पूर्वीं लोकांच्या मनांत पुरेशी बिंबलेली नव्हती. परंतु यापुढें असें होऊं नये. देशावर प्रेम करण्यास मुलांना ल्हाणपणापासून शिकविलें पाहिजे. म्हणजेच मोठे झाल्यावर देशासाठीं वाटेल ते कष्ट करण्यास ते तयार होतील. आज काल देवभक्ति व धर्मनिष्ठा पूर्वींप्रमाणें पुष्कळांच्या ठिकाणीं जळजळीत राहिल्या नाहींत. त्यांची जागा देशभक्तीनें घेतली पाहिजे. मरेन पण देशाशीं बेइमान होणार नाहीं असें प्रत्येकाच्या मनांत बाणलें पाहिजे.

स्वामिनिष्ठा, धर्मनिष्ठा किंवा देशभक्ति यांच्या व देशभक्तीच्या मध्यें विरोध येण्याचें कारण नाहीं. देव किंवा धर्म असें कदापि सांगत नाहीं, कीं देवासाठीं किंवा धर्मासाठीं देशाकडे दुर्लक्ष करा. आणि कोणाला जर धर्म पाळूं कीं देशाकडे पाहूं असें सांकडें पडलेंच तर त्यानें नि:शंकपणें देशाचेंच कार्य करावें.

या संबंधांत इंग्लंडच्या इतिहासांत एक फार बोधप्रद घटना आहे. चारशें वर्षांपूर्वीं इंग्लंडपेक्षां स्पेन देश फार प्रबळ होता. स्पेनचा राजा व लोक क्याथोलिक पंथाचे होते. इंग्लंडची राजकर्ती राणी व पुष्कळसे लोक प्रॉटेस्टंट पंथाचे होते. धर्माच्या बाबतींत या दोन पंथांचें एकमेकांशीं हाडवैर होतें. अशा परिस्थितींत स्पेनचा राजा व इंग्लंडची राणी यांच्यामध्यें युद्ध जुंपलें. स्पेनचें प्रबळ आरमार इंग्लंडवर चालून आलें. त्याचा जय झाला असता तर इंग्लंडवर स्पेन देशाचा अंमल बसला असता, तसेंच इंग्लंडमध्यें क्याथोलिक पंथाला मोठा पाठिंबा मिळाला असता. इंग्लंडच्या आरमाराचा मुख्य अधिकारी त्या वेळीं स्वत: क्याथोलिक होता. परंतु त्याच्या मनाला असा विचार शिवला नाहीं कीं क्याथोलिक स्पेनचा जय व्हावा. त्यानें स्पेनच्या आरमाराशीं निकराचा सामना दिला. त्याचें आरमार लहान होतें. तरी त्यानें आपल्या कौशल्यानें स्पेनच्या बलाढ्य आरमाराचा फडशा पाडला. देश कीं धर्म असा पेंच त्याला पडला नाहीं. धर्माचा विचार न करितां त्यानें देशाच्या बचावाकरितां स्वधर्मीयांशीं लढण्यासाठीं कंबर कसली.

हें उदाहरण नेहमीं डोळ्यांसमोर ठेवण्यासारखें आहे. आपल्या देशाचे लोक स्वधर्मनिष्ठ आहेत, परंतु धर्मनिष्ठा केव्हांहि आपल्या देशभक्तीच्या आड येतां कामा नये. देशाचें नुकसान करून किंवा

देशासाठीं करावा लागणारा त्याग टाळून धर्माचें पालन करूं इच्छिणें हा अधर्म आहे.

कित्येक लोक म्हणतात कीं आम्ही स्वतःला जगाचे नागरिक समजतों. स्वतःच्या देशापुरता आम्ही विचार करीत नाहीं. परंतु त्यांचें हें म्हणणें बरोबर नाहीं. त्यांना तसें प्रामाणिकपणें कदाचित् वाटतहि असेल, पण असें वाटण्यांत ते स्वतःची फसवणूक करीत असतात. सर्व जगाचें एक राज्य होईल तेव्हांच ते असें म्हणूं शकतील. पण जगांत जोंवर अनेक देश व राष्ट्रें आहेत, तोंवर "मी जगाचा नागरिक आहे, मला माझ्या देशाचें सुतक-सोयर नाहीं" असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बाहेरचे लोक त्यांना भारतीय म्हणूनच लेखतील. भारताचे सुस्थितीवर किंवा दुःस्थितीवर त्यांचें सुखदुःख अवलंबून राहील. म्हणून भारताच्या प्रत्येक नागरिकानें मनांत असेंच वागविलें पाहिजे कीं, "मी भारतीय आहे, व भारताच्या हितासाठीं व संरक्षणासाठीं मीं जास्तींत जास्त त्याग करीन."

## टीपा

पन्नादाई : राजपुतान्यांतील एका राजघराण्यांत गादीच्या वारशाबद्दल वाद लागून बनबीर नांवाच्या मनुष्यानें गादीवर आलेल्या आपल्या पुतण्याचा खून केला. त्याच्या तान्ह्या मुलाचाहि निकाल लावण्याकरितां तो राणीवशांत गेला. राजपुत्र कोठें आहे असें त्यानें पन्नादाईला विचारिलें. तेव्हां पन्नादाईनें खरा राजपुत्र न दाखवितां आपल्याच मुलाकडे बोट दाखविलें. बनबीर त्या मुलाच्या पोटांत तरवार खुपसून निघून गेला. याप्रमाणें दाईच्या स्वामिभक्तीनें वाचलेला राजपुत्र पुढें गादीवर आला.

नारायणराव पेशवा : वरच्यासारखीच पेशवाईत गोष्ट घडून आली. या पेशव्याचा वध त्याचा चुलता रघुनाथराव याच्या चिथावणीवरून गारद्यांनीं केला.

घटना : घडलेली गोष्ट.

क्याथोलिक व प्रॉटेस्टंट : ख्रिस्ती धर्माचे दोन पंथ. दोघेहि येशू ख्रिस्तास मानतात. क्याथोलिक पंथ जुना व प्रॉटेस्टंट चारपांचशें वर्षांपूर्वी निघालेला. प्रॉटेस्टंट लोक पोपचा धर्माध्यक्ष म्हणून अधिकार मानीत नाहींत. बायबलचा अर्थ लावण्याचा अधिकार पोप व धर्माधिकारी यांचाच नसून प्रत्येकास तो आहे असें तें म्हणतात. धर्माधिकाऱ्यांनीं विवाह करण्यास हरकत नाहीं, व घटस्फोट धर्मा-विरुद्ध नाहीं असेंहि प्रॉटेस्टंट समजतात.

♣ ♣ ♣

तर देशाचा कारभार करितांना देखील सरकारी पैसा ते काटकसरीनें खर्च करितील.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काटकसर हा आपल्या देशाचा एक राष्ट्रीय गुण झाला पाहिजे. प्रत्येकानें तो आपल्या अंगीं बाणवण्याचा यत्न केला पाहिजे. कृपणपणा नको, उधळपट्टीहि नको, अवश्य तेवढाच खर्च आपल्या आवाक्यांत राहील असा करणें हा या दोहोंच्या-मध्यें असलेला उत्तम मार्ग आपण धरावा. या बाबतींत सधन लोकांनीं उदाहरण घालून द्यावें. त्यांची रहाणी डामडौलाची असली तर गरीब लोकांनाहि तसेंच राहावेंसें वाटतें. ऐपतीच्या पलीकडे रहाण्याचा मोह सर्वसाधारण लोकांमध्यें पसरतो. सुस्थितींत असलेल्या लोकांवर ही एक मोठीं जबाबदारी आहे. उंची कपड्यांचा हव्यास, निरुद्योगी आयुष्यक्रम, सिनेमा, नाटकें, गाणें, बजावणें व खेळ यांचा वाजवीहून जास्त नाद या गोष्टी त्यांनीं कटाक्षानें टाळल्या पाहिजेत. चैनीची वागणूक ही कौतुकाची गोष्ट न होतां नाकें मुरडण्याची गोष्ट व्हावी. यामुळें वांचलेला पैसा त्यांनीं राष्ट्राला उपयोगी असलेल्या धंद्यांकडे किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या साह्याकडे लावावा.

जनतेला काटकसरीचें महत्त्व व आवश्यकता पटली म्हणजे त्याचा परिणाम सरकारी कारभारांत सुद्धां दिसूं लागेल. हल्लीं सरकारी समारंभांत डामडौल व बडेजाव फार असतो असें म्हणतात. पण डामडौल व बडेजाव लोकांना आवडतो असें समजून मंत्री व अधि-कारी सरकारी समारंभ भपकेबाज करूं पहातात. लोकांमध्यें या गोष्टींची नावड आहे असें दिसतांच तेहि आपलें धोरण खात्रीनें बदलतील.

.... ४

# साधी रहाणी व उच्च विचारसरणी

देशाचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं व त्याची भरभराट होण्यासाठीं भारतीयांच्या अंगीं देशनिष्ठा बाणली पाहिजे. ही निष्ठा नुसती मनांत असून उपयोगी नाहीं. ती आपल्या रोजच्या व्यवहारांत दिसून आली पाहिजे. तेव्हां या निष्ठेप्रमाणें आपण रोजच्या व्यवहारांत कसें वागलें पाहिजे याचा आपण विचार करूं.

देश म्हणजे एक मोठें कुटुंबच. तेव्हां आपल्या देशाची आज जशी स्थिति आहे तशाच स्थितींतलें एखादें कुटुंब त्या स्थितींतून वर येण्यास काय करील हें पाहूं. त्यावरून देशासाठीं आपण काय केलें पाहिजे तें आपल्या लक्षांत येईल.

आपला देश फार गरीब आहे. त्यामध्यें सुपीक जमीन, खाणी, मोठमोठ्या नद्या अशीं समृद्धीचीं साधनें पुष्कळ आहेत. पण त्यांचा उपयोग चांगल्या रीतीनें करावयास आपण अजून शिकलों नाहीं. त्यामुळें अमेरिका, इंग्लंड यांच्या मानानें आपलें दर माणशीं उत्पन्न फारच कमी आहे. तिकडचा मजूर व आपल्या देशांतील मजूर यांच्या राहाणींच्या मानांमध्यें फार मोठा फरक आहे. तिकडच्या मजुराला जीं सुखें मिळूं शकतात तीं आपल्याकडच्या मध्यम स्थितींतील कुटुंबांना सुद्धां मिळूं शकत नाहींत. पुरेसें अन्न, पुरेसें वस्त्र, व पुरेशी रहाण्याची जागा देखील आपला देश सर्व रहिवाश्यांस अजून पुरवूं शकत नाहीं. अशा गरीबींत असलेलें कुटुंब आपली स्थिति सुधारण्यासाठीं काय करील बरें ?

असें कुटुंब पहिल्यानें आपला खर्च फार काटकसरीनें करील, तसेंच आपली अवस्था आपल्यास सुधारावयाची आहे ही गोष्ट नेहमीं ध्यानांत ठेवील. देशाची स्थिति सुधारण्यासाठीं देशानें हेंच केलें पाहिजे. देशाची सुधारणा व्हावी म्हणून सरकार आटोकाट प्रयत्न करीत आहे. पुढारलेल्या व श्रीमंत देशांकडून पैसा, यंत्रें व कसबी कारागीर यांची मागणी करीत आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान, जर्मनी या देशांकडून आपण कोट्यावधि रुपयांचें कर्ज, यंत्रें व अन्नधान्यें यांच्या रूपानें काढलें आहे, व पुढें काढणार आहों. हें अवाढव्य कर्ज आपल्याला फेडावयाचें आहे. यासाठीं शक्य तेवढी काटकसर करून आपण देशासाठीं पैसा वांचविला पाहिजे. चैन व डामडौल यांस फांटा देऊन राहणी अगदीं साधी ठेवली पाहिजे. विचार मात्र उच्च पाहिजेत. देशांत सुख समाधान नांदेल असें करण्याची आपली महत्त्वाकांक्षा हवी. सर्व जगांत शांतता रहावी

म्हणून देखील आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. अशा परिस्थितींत आपलें राहाणें साधें, पण आपले विचार मात्र थोर असले पाहिजेत.

गरीब कुटुंबानें श्रीमंतांप्रमाणें रहाण्याची धडपड करणें योग्य नाहीं. श्रीमंतांसारखें वागण्यासाठीं जर त्या कुटुंबानें कर्ज काढण्याचा सपाटा चालविला तर आपण त्याला मूर्खांत काढूं. जसें कुटुंबाचें तसेंच देशाचें आहे. आपण इतर देशांपासून कर्ज काढीत आहों. या कर्जाचा आपण योग्य उपयोग केला पाहिजे. उसना घेतलेला पैसा रोजच्या गरजांसाठीं खर्च करून उपयोगी नाहीं. तो पैसा आपलें उत्पादन वाढवण्यासाठीं खर्च झाला पाहिजे. तर त्याची फेड आपल्या-कडून होऊं शकेल. त्यांतल्या त्यांत कर्जाऊ पैशानें चैनीच्या वस्तू परदेशांतून आणाविणें तर फारच वाईट. समजा आपण एक रुपयाची अशी वस्तू परदेशांतून आणली म्हणजे तो एक रुपया आपल्या देशांतील लोकांच्या उपयोगी न पडतां दुसऱ्या देशांतील लोकांच्या खिशांत जातो. हें आपण लक्षांत ठेवलें तर कोणतीहि चैनीची वस्तू आपण परदेशापासून घेण्याचें शक्य तोंवर टाळूं. काटकसरीची साधी-सुधी रहाणी आपल्या देशाच्या सध्याच्या अवस्थेंत याप्रमाणें अत्यंत निकडीची गोष्ट आहे. सरकारचा कारभार उधळपट्टीचा आहे अशी टीका आपण पुष्कळदां ऐकतों व करितो. पण आपल्या घरचा कारभार काटकसरीचा आहे कीं उधळपट्टीचा आहे हें आपल्यास पहावयाला नको का? सर्वसाधारण कुटुंबांची रहाणी साधी व काटकसरीची झाली, म्हणजे देशाचा कारभार देखील साधा व काटकसरीचा होईल. सरकारी कारभार चालविणारे लोक तरी आपलेच आहेत ना? त्यांचा घरचा कारभार काटकसरीचा असेल,

तर देशाचा कारभार करितांना देखील सरकारी पैसा ते काटकसरीनें खर्च करितील.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काटकसर हा आपल्या देशाचा एक राष्ट्रीय गुण झाला पाहिजे. प्रत्येकानें तो आपल्या अंगीं बाणवण्याचा यत्न केला पाहिजे. कृपणपणा नको, उधळपट्टीहि नको, अवश्य तेवढाच खर्च आपल्या आवाक्यांत राहील असा करणें हा या दोहोंच्या-मध्यें असलेला उत्तम मार्ग आपण धरावा. या बाबतींत सधन लोकांनीं उदाहरण घालून द्यावें. त्यांची रहाणी डामडौलाची असली तर गरीब लोकांनाहि तसेंच राहावेंसें वाटतें. ऐपतीच्या पलीकडे रहाण्याचा मोह सर्वसाधारण लोकांमध्यें पसरतो. सुस्थितींत असलेल्या लोकांवर ही एक मोठीं जबाबदारी आहे. उंची कपड्यांचा हव्यास, निरुद्योगी आयुष्यक्रम, सिनेमा, नाटकें, गाणें, बजावणें व खेळ यांचा वाजवीहून जास्त नाद या गोष्टी त्यांनीं कटाक्षानें टाळल्या पाहिजेत. चैनीची वागणूक ही कौतुकाची गोष्ट न होतां नाकें मुरडण्याची गोष्ट व्हावी. यामुळें वांचलेला पैसा त्यांनीं राष्ट्राला उपयोगी असलेल्या धंद्यांकडे किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या साह्याकडे लावावा.

जनतेला काटकसरीचें महत्त्व व आवश्यकता पटली म्हणजे त्याचा परिणाम सरकारी कारभारांत सुद्धां दिसूं लागेल. हल्लीं सरकारी समारंभांत डामडौल व बडेजाव फार असतो असें म्हणतात. पण डामडौल व बडेजाव लोकांना आवडतो असें समजून मंत्री व अधि-कारी सरकारी समारंभ भपकेबाज करूं पहातात. लोकांमध्यें या गोष्टींची नावड आहे असें दिसतांच तेहि आपलें धोरण खात्रीनें बदलतील.

जरा बारकाईनें पहा. किती तरी अनावश्यक गोष्टी आपल्या रोजच्या जीवनांत शिरलेल्या दिसतील. छानछोकीचे कपडे, निरनिराळीं सुगंधी द्रव्यें, तोंडाला लावावयाच्या पावडरी, सिगारेट, सिनेमा, साध्या आजारांवर महाग परदेशी औषधें यांवर कितीतरी विनाकारण खर्च होत आहे. अशा पुष्कळशा वस्तू परदेशांतून येतात किंवा परदेशांतून आणलेला कच्चा माल वापरून बनविलेल्या असतात. त्या देशी असल्या तरी त्या तयार करण्यास पैसा व श्रम लागतातच. तो पैसा व ते श्रम आवश्यक पदार्थ करण्याच्या कामीं लावले तर देशाचा किती तरी फायदा होईल.

आपण महात्मा गांधींचा नेहमीं जयजयकार करितों. त्यांचें उदाहरण या बाबतींत डोळ्यासमोर ठेवलें पाहिजे. त्यांची राहाणी किती साधी होती हें आपण विसरतों. फार दिवसाची गोष्ट आहे. दक्षिण आफ्रिका सोडून महात्माजी ( त्या वेळचे बॅरिस्टर गांधी ) हिंदुस्थानांत कायमचे राहाण्यास आले होते. त्यांच्या पुढील कार्यासंबंधीं चर्चा करण्यासाठीं त्यांना नामदार गोखल्यांनीं पुण्यास बोलाविलें होतें. ते ज्या गाडीनें यावयाचे त्या गाडीच्या वेळेवर त्यांना उतरून घेण्यासाठीं कांहीं सद्गृहस्थ गेले होते. गाडी आल्यावर त्यांनीं पहिल्या वर्गाचे नंतर दुसऱ्या वर्गाचे डबे पाहिले. पण बॅ. गांधी दिसले नाहींत. उतरलेले लोक टांगे व्हिक्टोरिया ठरवीत होते. तिकडे त्यांनीं शोधलें, पण त्यांचा पत्ता नाहीं. बरीच धांवपळ केल्यावर त्यांना बॅरिस्टरसाहेब दिसले. हातारखांद्यावर आपलें सामान घेऊन तिसऱ्या वर्गाच्या प्रवाश्यांच्या घोळक्यांत ते चालले होते. त्यांचा साधेपणा पाहून स्वागतासाठीं गेलेली मंडळी थक्कच झाली. हें साधें सुधें जीवन महात्माजींनीं देशाच्या उन्नतीसाठीं अवश्य म्हणून स्वीकारिलें होतें.

त्यांच्याविषयीं आदर दाखवावयाचा, व आपण त्यांचे अनुयायी आहों असा दावा करावयचा, तर आपणहि त्यांच्याप्रमाणें साधीसुधी राहणी व उच्च विचारसरणी ह्या गोष्टी आपल्या आचरणांत आणल्या पाहिजेत. यांतच आपला व आपल्या देशाचा तरणोपाय आहे.

## टीपा

महत्त्वाकांक्षा : मोठेपणा किंवा मोठें पद मिळविण्याची किंवा एखादें मोठें कृत्य करून दाखविण्याची तीव्र इच्छा.

आयुष्यक्रम : दिवस घालविण्यासाठीं ठरविलेलीं रीत किंवा कामें.

द्रव्य : पदार्थ.

उत्पादन : उत्पन्न करणें, तयार करणें.

उन्नति : उत्कर्ष, सुधारणा.

♣ ♣ ♣

ग्रहालय ठाणे
72324

....५

# सचोटी

कोणताहि मनुष्य स्वत:साठीं प्रत्येक गोष्ट स्वतः करूं शकत नाहीं. किती तरी कामासाठीं प्रत्येकाला दुसऱ्यांवर अवलंबून राहावें लागतें. तसेंच प्रत्येकावर दुसरे लोक कांहीं ना कांहीं कामासाठीं अवलंबून असतात. म्हणून जगाचा व्यवहार नीट चालण्यासाठीं प्रत्येकानें आपलीं कामें नीट केलीं पाहिजेत. कोणी कोणाला फसवितां कामा नये. दिलेलीं वचनें सर्वांनीं पाळलीं पाहिजेत. जग मनुष्यांच्या परस्पर विश्वासावर चाललें आहे. असा विश्वास कायम रहाण्यासाठीं सर्वांनीं सचोटीनें व्यवहार केला पाहिजे.

पूर्वींच्या काळीं आपल्या देशांत सचोटी हा गुण सर्वांच्या ठिकाणीं असे. हिंदूंच्या धार्मिक पुस्तकांत सांगितलें आहे : 'न हि सत्यात्परो धर्मः' सत्याहून निराळा अथवा श्रेष्ठ धर्म नाहीं. इतर

धर्मांतहि खरें बोलणें व प्रामाणिकपणानें वागणें यांस फार महत्त्व दिलें आहे. धर्माची आज्ञा पाळण्यासाठीं म्हणा, किंवा आपले सर्व व्यवहार सुरळीत चालण्यासाठीं म्हणा, खरेपणा अवश्य आहे.

पुराणांत सचोटीचा मोठेपणा दाखविणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. राजा हरिश्चंद्राची गोष्ट घ्या. त्यानें एका ऋषीला स्वप्नांत कांहीं वचन दिलें होतें. पुढें तो ऋषी राजाकडे आला, व दिलेलें वचन पुरें कर असें राजाला म्हणूं लागला. स्वप्नांत दिलेलें वचन खरोखर पुरें करावयास नको. परंतु हरिश्चंद्र असें बोलला नाहीं. सत्यावर त्याची अतोनात भक्ति होती. स्वप्नांत दिलेलें वचनसुद्धां पुरें केलें पाहिजे असें तो समजत होता. म्हणून राजा हरिश्चंद्र, त्याची पत्नी व लहान मुलगा यांनीं हाल अपेष्टा भोगल्या आणि ऋषीला दिलेलें वचन पुरें केलें.

रामायणांतील रामाची कथा अशीच आहे. त्याचा बाप दशरथ यानें आपल्या कैकेयी नांवाच्या राणीला ती म्हणेल त्या दोन गोष्टी करण्याचें वचन दिलें होतें. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं दशरथानें आपला थोरला मुलगा रामचंद्र यास युवराज करण्याचें ठरविलें. युवराजाला राजाचे पुष्कळसे अधिकार असत. तसेंच राजाच्या मागें त्यालाच गादी मिळत असे. रामचंद्राच्या अभिषेकाची सर्व तयारी झाली. परंतु अभिषेकाच्या आधीच्या दिवशीं कैकेयी दशरथाला म्हणाली, ‘ तुम्ही मला दोन गोष्टी कबूल केल्या आहेत. त्या दोन गोष्टी मी आतां मागतें. रामचंद्राला युवराज न करितां माझा मुलगा भरत याला युवराज करा व रामचंद्राला बारा वर्षें वनवासाला पाठवा.’ दशरथाला मोठी पंचाईत पडली. रामचंद्रावर त्याचें व तसेंच

सर्व प्रजेचें प्रेम होतें. युवराज होण्यास तो सर्वप्रकारें योग्य होता. तेव्हां भरताला त्याच्या जागीं युवराज करणें योग्य नव्हतें, व तें लोकांनाही आवडलें नसतें. त्याला वनवासांत पाठविणें हें तर त्याहून अधिक कठीण होतें. कारण दशरथाला रामचंद्राशिवाय जगणेंहि अशक्य होतें. कैकेयीच्या मागण्याहि नाकारतां येत नव्हत्या. कारण तिला दिलेलें वचन मोडतां येत नव्हतें. पित्याला अशा अडचणींत पडलेला पाहून रामचंद्रानें आपण होऊन युवराजपद सोडून दिलें व वनवासास जावयाचें ठरविलें. याप्रमाणें वचनभंग केल्याचा दोष त्यानें पित्याला लागूं दिला नाहीं.

इतर पुराणांत देखील सत्य-प्रेमाच्या अनेक गोष्टी आहेत. सत्याला आपल्या देशांत मोठा मान होता असें इतिहासांत देखील आढळतें. दोन हजार वर्षांपूर्वीं आपल्या देशावर अलेक्झांडरनामक ग्रीस देशाच्या राजानें स्वारी केली होती. त्या वेळीं व त्यानंतर दोनशें तीनशें वर्षे पुष्कळ ग्रीक लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले होते. त्यांनीं त्या वेळच्या हिंदुस्थानच्या लोकांचें वर्णन आपल्या ग्रंथांतून लिहून ठेवलें आहे. त्यांच्या मतें हिंदुस्थानचे लोक कायदा पाळणारे, सत्यवचनी काटकसरी व उद्योगी होते. हजार बाराशें वर्षांपूर्वीं ह्यूएनत्संग नांवाचा एक चिनी प्रवाशी हिंदुस्थानांत आला होता. त्यानें आपल्या प्रवासाचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. त्यांत त्यानेंहि लिहून ठेवलें आहे कीं भारतीय लोक सत्यवचनी, प्रामाणिक, कायदे पाळणारे व शांतताप्रिय आहेत, त्यांच्या घरांना कुलपें असत नाहींत. चारपांचशें वर्षांपूर्वीं आपल्या देशांत आलेल्या युरोपिअन प्रवाशांनीं देखील असेंच लिहून ठेवलें आहे.

[library stamp] ५५५०२ ... निर्बंध ... २००२ ... २८/७



पण मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं, सत्यावरची आपली निष्ठा आज पहिल्याप्रमाणें राहिली नाहीं. व्यवहारांत जिकडे तिकडे खोटेपणाच बोकाळलेला दिसतो. निर्भेळ दूध तूप मिळणें कठीण झालें आहे. दुधांत पाणी तरी मिसळलेलें असतें किंवा परदेशी दुधाची पूड पाण्यांत कालवून तयार केलेलें दूध ताज्या दुधांत मिसळतात. तुपामध्यें ' वनस्पती ' किंवा इतर तेलकट पदार्थ मिसळलेला असतो. त्यामुळें खाणारांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होतात. धान्यांत देखील हलक्या धान्याची किंवा रेती मातीची किंवा केराची मिसळ असते. किंमतीच्या बाबतींत दुकानदार गिऱ्हाईकांची फसवणूक करितात. वजनें व मापें पुष्कळदां खोटीं असतात. काळा बाजार सर्वांच्या परिचयाचा आहे. कोर्ट-कचेऱ्यांतून खोटे साक्षीदार उभे करणें किंवा साक्षीदारांनीं खऱ्या बरोबर खोटें शपथेवर सांगणें ह्या रोजच्या अनुभवाच्या गोष्टी आहेत. याप्रमाणें नेहमींच्या व्यवहारांत पदोपदीं खोटेपणा आढळतो. प्रामाणिक सावकार व असाम्या क्वचि-तच आढळतात.

ही परिस्थिति चांगली आहे का ? आपला एकमेकांवर पूर्ण विश्वास पाहिजे. असा विश्वास बसण्यासाठीं सर्वांनीं सचोटीनें वागलें पाहिजे. तरच आपण अडचणीच्या वेळीं एकमेकांस उपयोगी पडूं. देशावर संकट आलें तर एकमेकांच्या खांद्याशीं खांदा लावून लढूं. स्वतःच्या फायद्यासाठीं शेजाऱ्यांशीं व इतर लोकांशीं अप्रामाणिकपणें वागणारे लोक प्रसंगीं देशाशीं सुद्धां बेइमान होतील. अप्रामाणिक लोक देशांत फंदफितुरी माजवतात. गेल्या सहाशें वर्षांच्या इतिहासांत आपल्या देशांतल्या फितुरीचीं अनेक उदाहरणें सापडतील. सत्य व प्रामाणिक-पणा यांवरील लोकांची निष्ठा ढळली, म्हणूनच असे प्रकार घडले.

देशाचें स्वातंत्र्य टिकण्यासाठीं फितुरीपणा नाहींसा झाला पाहिजे. नित्याच्या वागणुकींत आपण प्रामाणिकपणा राखावा म्हणजे देशाच्या संकटाच्या प्रसंगीं आपण देशाशीं इमानदार राहूं. आज काळा बाजार करणारे लोक उद्यां स्वतःच्या फायद्यासाठीं देशाशीं द्रोह करण्यास मागें पुढें पाहाणार नाहींत.

फितुरीच्या पायीं मोठमोठीं राष्ट्रें धुळीस मिळालीं आहेत. रोमन लोकांचें पूर्वीं एक मोठें साम्राज्य होतें. ते लोक बुद्धिमान व पराक्रमी होते. त्यांनीं युरोपांतील सर्व देश व आशिया आफ्रिकेंतलि बरेच देश पादाक्रांत केले. याप्रमाणें शेंकडों वर्षें त्या राष्ट्रानें वैभव भोगलें. पण पुढें त्या लोकांमधील प्रामाणिकपणा ओसरूं लागला. लाचखाऊ व खोटीं कामें करणारे लोक मोठ्या अधिकारांवर राहूं लागले. जुगर्था नांवाचा त्यांच्या साम्राज्यांतील आफ्रिकेचा एक मांडलिक राजा आपल्या कामासाठीं रोम शहरीं गेला होता. तेथील सीनेटच्या म्हणजे राज्यसभेच्या सभासदांना लांच देऊन त्यानें आपलें काम करून घेतलें. परत जातांना तो म्हणाला, ‘पाहा, हें शहर विकावयास निघालें आहे. एखाद्या खरेदीदाराचीच वाण आहे!’ आणि खरोखरच त्या साम्राज्यास उतरती कळा लागली व कांहीं काळानें सचोटीच्या अभावामुळें त्या साम्राज्याचा शेवट झाला.

आपल्याला इतक्या अवधीनंतर स्वातंत्र्य मिळालें आहे. तें टिकविण्यासाठीं आपल्यामध्यें सचोटीचा गुण पुन्हा पहिल्याप्रमाणें बाणला पाहिजे. लोक ओरडतात कीं हल्लीं राज्यकारभारामध्यें लांचलुचपत व वशिलेबाजी फार शिरली आहे. सरकारी खात्यांतील लोक खिशांत कांहीं पडल्याशिवाय आपलीं ठरलेलीं कामेंसुद्धां वेळेवर करीत नाहींत.

ही परिस्थिति फार भयंकर आहे. ही जितक्या लवकर बदलेल तितकें चांगलें. नाहींतर या दुर्गुणांच्या पायीं राष्ट्रांची जी पूर्वी गत झाली तीच आपल्या नशिबीं येईल.

इंग्रजांना आपण पुष्कळ नांवें ठेवतों. पण सचोटीचा गुण त्यांच्या ठायीं आपल्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक आहे. इंग्रजांचा संबंध आपल्या देशाशीं कमी अधिक चारशें वर्षें आहे. राष्ट्राशीं बेमान झालेला इंग्रज मनुष्य एवढ्या मोठ्या अवधींत दिसलेला नाहीं. तसेंच व्यापारामध्यें आजहि इंग्रज व्यापारी देशी व्यापाऱ्यापेक्षां अधिक विश्वासार्ह असतात. परदेशांत माल पाठवितांना पुष्कळदां आपले व्यापारी नमुन्याबरहुकूम माल पाठवीत नाहींत. त्यामुळें इतर देशांत आपल्या देशाची नापत होते, व देशाच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम होतो.

सचोटीचा अभाव हा रोग आपल्या राष्ट्रामध्यें पुष्कळच बळावला आहे. म्हणून आपल्या देशाचें आपल्याला आग्रहानें सांगणें आहे कीं हा रोग आपल्यांतून समूळ नाहींसा करा. दुसरे सचोटीनें वागतात कीं नाहीं हें आपण पाहात बसूं नये. आपण स्वतः सचोटीनें वागण्याचा निश्चय करावा. आपल्या उदाहरणानें दुसरे लोकहि सचोटीनें वागूं लागतील.

## टीपा

रामायण : एक प्राचीन संस्कृत महाकाव्य. वाल्मीकीनें रचिलेलें. यांत एक-वचनी, एकपत्नी व एकबाणी श्रीरामचंद्राचें चरित्र वर्णिलें आहे. यांत तीन हजार वर्षांपूर्वींच्या हिंदुस्थानांतील समाजाचें चित्र पहावयास सापडतें.

महती : मोठेपणा, महत्त्व.

द्रोह : दुष्टावा, बेइमानी.

रोमन लोक : यूरोपांतील इटली देशाची राजधानी रोम शहर. तेथील लोक. पुढें हा शब्द इटली देशांतील सर्व लोकांना लावूं लागले. रोमन लोक इसवीसनाचे अगोदर पासून कला, शौर्य व राज्यकारभार याबद्दल प्रसिद्ध होते. त्यांच्यामध्यें जूलियस सीझर हा विख्यात सेनापती होऊन गेला. त्यानें अनेक देश जिंकले व रोमन साम्राज्य वाढविलें. हें साम्राज्य सुमारें पांचशें वर्षें चांगलें चाललें.

पादाक्रांत : पायांखालीं घातलेला; म्हणजे जिंकलेला.

विश्वासार्ह : विश्वास ठेवण्याजोगा, भरंवशालायक.

♣ ♣ ♣

.... ६

# सहकार

एक आंधळा मनुष्य व एक लंगडा मनुष्य हे एकमेकांच्या उपयोगी कसे पडले ही गोष्ट पुष्कळांस माहीत असेल. त्या दोघांना एकाच बिकट वाटेनें जायचें होतें. लंगडा मनुष्य पंगु असल्यामुळें त्या वाटेनें जाऊं शकत नव्हता. आंधळा मनुष्य धडधाकट होता, पण त्याला वाट दिसत नव्हती. एखाद्या खड्ड्यांत किंवा कांटाकुट्यांत पडण्याची त्याला भीति होती. थोडा वेळ दोघेहि थबकून राहिले. मग लंगडा आंधळ्यास म्हणाला ‘ गड्या, तूं मला खांद्यावर घे. मी तुला वाटेनें कसें जायचें तें सांगेन. अशा रीतीनें आपण दोघेहि बिकट वाट ओलांडून चांगल्या जागेवर जाऊन पोंचूं.’ आंधळ्याला ही गोष्ट मानवली. त्यानें लंगड्या मनुष्यास खांद्यावर घेतलें व एकमेकांच्या मदतीनें त्या दोघांनीं ती बिकट वाट पार केली.

पंचतंत्र नांवाच्या संस्कृत पुस्तकांत एक कथा आहे. पारव्यांचा एक थवा अन्नाच्या शोधासाठीं आकाशांतून उडत चालला होता. एका रानावरून उडत जात असतांना त्यांना एका ठिकाणीं पुष्कळसे तांदुळाचे दाणे विखुरलेले दिसले. त्याबरोबर कांहीं एक विचार न करितां दाणे टिपण्यासाठीं ते जमिनीवर उतरले. पण ते दाणे एका पारध्यानें टाकलेले होते. व त्यांच्यावर एक बारीक जाळें पसरलेलें होतें. दाणे पाहून हुरळलेल्या त्या पारव्यांचें लक्ष जाळ्याकडे गेलें नाहीं व सर्वजण त्या जाळ्यांत अडकले. पारधी जवळच लपून बसला होता. तो सोटा घेऊन त्यांना मारण्याकरितां सरसावला. पारव्यांना वाटलें, आपलीं शंभर वर्षे भरलीं. परंतु त्यांचा राजा शहाणा होता. त्यानें पारव्यांना सांगितलें ' आपण सर्वजण एकदम उडावयास लागूं. आपले पाय जाळ्यांत अडकले आहेत. पण पंख मोकळे आहेत. आपण सर्वजण एकदम उडूं लागलों म्हणजे आपण जाळ्यासुद्धां उडून जाऊं शकूं. याप्रमाणें पारध्याच्या हातून सुटल्यावर मी तुम्हांला माझ्या एका उंदीर मित्राकडे घेऊन जाईन. तो जाळें तोडून आपल्याला सोडवील. ' हा सल्ला पारव्यांना पटला. पारधी जवळ येऊन पोंचण्याच्या अगोदर सर्वांनीं आपले पंख एकदम फडफडावले. त्या बरोबर जाळ्यासुद्धां उडून ते पारध्याच्या तडाक्यांतून सुटले. पुढें उंदरानें जाळें तोडून सर्वांना मोकळें केलें.

या दोन लहान गोष्टींमध्यें सहकाराचें सार साठविलें आहे. कोणताहि मनुष्य त्याला हवी ती प्रत्येक गोष्ट स्वतः किंवा एकटा करूं शकत नाहीं. त्याला दुसऱ्याचें साह्य लागतें. तें मिळविण्यासाठीं त्याला दुसऱ्यांस साह्य करण्यासाठीं तयार असावें लागतें. याप्रमाणें एकमेकांना साह्य केल्यानें सर्वांचीं कामें चांगल्या रीतीनें पार पडतात.

आज जगांत सर्व प्राण्यांवर मनुष्याची सत्ता आहे. एक एकटा मनुष्य घेतला, तर त्याच्याहून बळकट असे किती तरी प्राणी जगांत आहेत. एका हत्तीचें बळ दहा माणसांच्या बळाहून जास्त असतें. वाघ, सिंह, अस्वल अशा एखाद्या जनावराशीं एकटा मनुष्य सामना देऊं शकणार नाहीं. फार प्राचीन काळीं तर आजच्या हत्तीपेक्षांहि किती तरी प्रचंड प्राणी या जगांत वावरत होते. त्या सर्वांवर मात करून मनुष्य त्यांच्यावर आपली हुकमत चालवीत आहे. ही गोष्ट कशामुळें शक्य झाली? केवळ सहकार्यामुळें.

संतश्रेष्ठ तुकोबारायांनीं म्हटलें आहे,

'एकमेकां साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ।'

हा उपदेश बहुमोलाचा आहे. देशाचा उत्कर्ष साधण्यासाठीं सर्वांनीं मिळून अवश्य तीं कामें केलीं पाहिजेत. आपला देश उद्योगधंद्यांत मागासलेला आहे. पुरेसें भांडवल आपल्याजवळ नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांमध्यें आपली फारशी प्रगति नाहीं. नवीन पद्धतीचीं यंत्रेंहि आपल्याजवळ मुबलक नाहींत. अशा अवस्थेंत आपण सर्वांनीं मिळून आपलें मनुष्यबळ एकवटलें पाहिजे. भांडवल व यंत्रसामग्री यांची उणीव आपल्या संख्याबळानें आपण भरून काढली पाहिजे.

सहकार्याची कल्पना आपल्या देशाला नवीन नाहीं. पूर्वीं खेड्यांत पंचायती असत. खेड्यांचीं सर्व उपयुक्त कामें त्या करीत व गांवांतले सर्व वाद तोडीत. पंचायतींचें काम हा सहकार्याचा उत्तम नमुना होता. त्यावरूनच आपल्याकडे म्हण पडली आहे 'पांचामुखीं परमेश्वर' किंवा 'गांव करील तें राव काय करील?' म्हणजे राजाला सुद्धां न जमणारें काम सर्व गांव एकवटून तडीस नेईल.

आपल्या देशांत खेड्यापाड्यांमधून उत्तम सहकार्य लोकांमध्यें होतें म्हणूनच ही म्हण पडली.

जनतेंतली ही सहकार्याची भावना दीडशें वर्षांपूर्वीपर्यंत चांगली बळकट होती. इंग्रजांचें राज्य सुरू झाल्यावर खेड्यांचा कारभार पंचायतींच्याकडून त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांवर सोपविला. त्यामुळें खेड्यांतील लोक आपल्या कामांसाठीं गावांतील पंचांऐवजीं सरकार-कडे जास्त जास्त पाहूं लागले. अशा रीतीनें पंचायतींची संस्था हळू हळू कमजोर होऊं लागली. सरकारी कारभार पूर्वींपेक्षां जास्त व्यवस्थित झाला. परंतु त्याच मानानें खेड्यांतील लोकांचें परस्पर सहकार्य कमी कमी होऊं लागलें. एकोप्याची भावना नष्ट झाली. सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी संभाळणारा व त्यांच्या पाठिंब्याच्या जोरावर गांवकरी लोकांवर आपलें वजन बसविणारा वर्ग तयार होऊं लागला. अशा लोकांच्या चढाओढीमध्यें खेड्यापाड्यांतून जुटीच्या ऐवजीं फूटफाट पडूं लागली. गांवोगावीं पार्ट्या म्हणजे पक्ष उत्पन्न झाले व सहकार्याचा बोजवारा उडाला.

आपल्या देशांतले शेंकडा ८० लोक खेड्यांतून राहातात. खेड्यांमध्यें फाटाफूट व सहकार्याचा अभाव. मग खेड्यांची अवस्था कशी सुधारायची? आणि खेडीं सुधारल्याशिवाय एकंदर देशाची भरभराट कशी व्हायची? ह्या सर्व गोष्टींचा विचार करून आपल्या सरकारनें सहकार्यावर विशेष भर दिला आहे. परंतु नुसत्या सरकारच्या कायद्यांनीं व घोषणांनीं सहकार्य थोडेंच उत्पन्न होईल? त्यासाठीं जनतेचें मनापासून साह्य पाहिजे. म्हणून आपण मनाशीं खूणगांठ बांधूं या कीं, देश सुधारण्यासाठीं आपण एकमेकांशीं सहकार्य केलें पाहिजे.

आपल्या देशांत सहकार्याला इंग्रज सरकारानें पन्नास साठ वर्षांपूर्वी चालना दिली. त्यानें सहकारी संस्थांचा कायदा केला. सहकार्याचें एक स्वतंत्र खातें उघडलें. शेतकरी लोक कर्जानें गांजले होते. त्यांना कर्जमुक्त करण्यासाठीं पतपेढ्यांमार्फत व्याजाच्या स्वस्त दरानें कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्याचें काम त्या सरकारनें प्रथम हातीं घेतलें. परंतु बहुतेक शेतकरी अशिक्षित. सहकार्याची जुनी परंपरा नाहींशी झालेली. त्यामुळें या प्रयत्नास पुष्कळ वर्षें विशेष यश लाभलें नाहीं. संयुक्त जबाबदारीच्या नियमामुळें पुष्कळ सुखवस्तू शेतकऱ्यांवर इतर सभासदांकडे थकित झालेल्या कर्जाचा बोजा बसून त्यांची स्थिति केविलवाणी झाली व याचें खापर सहकारी चळवळीवर फोडण्यांत येऊं लागलें व सहकारी पतपेढ्यांविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित झालीं. सहकार्याचा हा पहिला प्रयत्न फसल्यासारखा झाला. कर्जाखेरीज इतर बाबतींत सहकार्याचा अवलंब करणें शक्य झालें नाहीं.

परिस्थिति आतां पुष्कळ सुधारली आहे. शेतकरी वर्गामध्यें शिक्षणानें पुष्कळ पुढें पाऊल टाकलें आहे. संयुक्त जबाबदारी संबंधाचे नियमहि पुष्कळ सौम्य केले आहेत. म्हणून आतां पतपेढ्यांचा प्रसार झपाट्यानें होत आहे. माफक व्याजानें कर्ज मिळण्याच्या व्यवस्थेशिवाय दुसऱ्या बाबींत सहकार्य सुरू करण्याचे प्रयत्न सरकार व लोकांचे पुढारी आत्मविश्वासानें करूं लागले आहेत. शेतीचा माल विकण्यासाठीं, शेतीसाठीं, खतें, चांगलें बीं व यंत्रें विकत घेण्यासाठीं सोसायट्या निघत आहेत. विणकऱ्यांच्या, दूध पुरविणारांच्या, बागाईतदारांच्या व दुसऱ्या धंदेवाईकांच्या सहकारी संस्था ठिकठिकाणीं काम करीत आहेत. गुजराथेंत कापूस वठण्याचे व रुई दाबण्याचे कारखाने, तसेंच महाराष्ट्रांत साखरेचे मोठमोठे कारखाने सहकारी तत्त्वावर स्थापन झाले आहेत.

या सर्व गोष्टी आशादायक आहेत. सहकार या शब्दाचा संस्कृतमध्यें आंबा असा एक अर्थ आहे. आपण विचार करीत आहों तो सहकार खरोखरच आंब्याच्या वृक्षाप्रमाणें गोड फळें देणारा आहे. पण सहकाराच्या या वृक्षाला गोड व भरपूर फळें लागण्यासाठीं कित्येक गुणांचें भरपूर खत त्याला मिळालें पाहिजे.

पहिला गुण इतरांस साह्य करण्याची बुद्धि. हा गुण सहकार्याचा पाया आहे. मला पदोपदीं लोकांचें साह्य लागतें. तर मग मीं सुद्धां लोकांच्या उपयोगी पडलें पाहिजे. तें माझें कर्तव्यच ठरतें. समाज-व्यवस्था नीट राहण्यासाठीं सर्वांनीं एकमेकांशीं देवाणघेवाण केली पाहिजे. नाहींतर समाजाचा गाडा अडकून पडेल.

दुसरा गुण सहकार्याबद्दल निष्ठा हा होय. माझ्या स्वतःच्या व देशाच्या उन्नतीचें सहकारिता हें अचूक साधन आहे असा दृढ विश्वास मनांत बाणला पाहिजे.

तिसरा गुण प्रामाणिकपणा, याबद्दल सचोटी या प्रकरणांत पुरेसें विवेचन केलें आहे. म्हणून आतां जास्त लिहिण्याची गरज नाहीं.

चवथा गुण आहे काटकसर. गरीबींतून बाहेर पडण्यासाठीं तर आपल्याला सहकार्य पाहिजे. मग काटकसर केल्याशिवाय कसें चालेल? होतां होईल तों मी कर्ज काढणार नाहीं, माझ्या उत्पन्नांतूनच मी सर्व भागवीन असा निश्चय प्रत्येकानें करावा.

आणि पांचवा गुण वक्तशीरपणा. आपल्या देशांत पूर्वीपासून या गुणाची फार वाण आहे. कोणतेंहि काम नीट होण्यासाठीं तें योग्य वेळीं झालेंच पाहिजे. योग्य वेळ निघून गेली तर काम बिघडणारच. सर्वांनीं मिळून काम करायचें, तर कामासाठीं ठरलेल्या वेळीं सर्वजण कामाला लागावयास नको का? पण पुष्कळदां असें होतें कीं ठरलेली

वेळ सहा असेल, तर लोक जमूं लागतात साडेसहा पासून. पुरेसे लोक जमेपर्यंत प्रथम आलेले लोक कंटाळून निघून जातात. सगळ्यांनीं मिळून करावयाच्या कामासाठीं सगळे लोक हजर नसतात, व परिणामीं काम होत नाहीं, किंवा बिनसतें. म्हणून सहकार्यामध्यें वेळच्या वेळीं काम करणें फार महत्त्वाचें आहे.

हे वर सांगितलेले पांच गुण प्रत्येकानें आपल्या अंगीं आणण्याची पराकाष्ठा करावी. मग सहकार्य यशस्वी होण्यास उशीर नाहीं.

## टीपा

पंचतंत्र : हें पुस्तक लोकांना व्यवहाराचें ज्ञान शिकविण्यासाठीं संस्कृत-मध्यें सोप्या भाषेंत लिहिलेलें आहे. मनुष्यानें निरनिराळ्या प्रसंगीं कसें वागावें हें गोष्टीच्या रूपानें यांत दाखविलें आहे.

परंपरा : एका पिढीपासून दूसऱ्या पिढीला याप्रमाणें चालत आलेली गोष्ट किंवा रीत; रूढी.

कलुषित : गढूळ झालेलें; खराब झालेलें.

पतपेढी : एखाद्याची पत म्हणजे कबूल केल्याप्रमाणें तो करील किंवा वागेल असा विश्वास. असा विश्वास एखाद्या माणसावर बसेल, त्यापेक्षां दहा माणसावर जास्त बसेल. म्हणून एकाला कर्ज देण्यापेक्षां दहाजणांना मिळून देणें जास्त सुरक्षित असतें, व त्यामुळें व्याजाचा दर सावकार कमी करतो. याप्रमाणें दहा किंवा अधिक माणसें ज्या संस्थेंत आपली पत एकत्रित करितात, व एकमेकांस जामीन रहातात, तिला पतपेढी म्हणतात.

संयुक्त जवाबदारी : पतपेढींतील प्रत्येक सभासद आपण घेतलेल्या, तसाच इतर सभासदांनीं घेतलेल्या कर्जाच्या फेडीसाठीं जवाबदार असतो. एखाद्या सभासदानें कोणत्याहि कारणानें आपलें कर्ज फेडलें नाहीं, तर तें इतरांस फेडून द्यावें लागतें. याचें नांव संयुक्त म्हणजे सर्वांनीं घेतलेली किंवा सर्वांवर बसविलेली जवाबदारी.

तत्त्व : कोणत्याहि वस्तूचें सार किंवा खरें स्वरूप. यावरून तत्त्व म्हणजे खरा नियम असा अर्थ निघाला.

.... ७

# सहिष्णुता

सहिष्णुता या शब्दाचा मूळ अर्थ सहन करण्याची शक्ति किंवा वृत्ति असा आहे. आपल्याला पुष्कळ गोष्टी सहन कराव्या लागतात. अपमान, दुःख, रोग, अडचणी, उपद्रव, छळ, मार, कष्ट यांपैकीं कांहींना कांहीं गोष्टी आपल्याला सहन कराव्या लागतात. पण या गोष्टी सहन करण्याच्या शक्तीला सहिष्णुता हा शब्द लावीत नाहींत. माणसां-माणसांमध्यें अनेक भेद (वेगळेपणाचे प्रकार) असतात. उदाहरणें घ्यायचीं तर माणसांमध्यें धर्म, देश, भाषा, प्रांत, जाती, किंवा मतें यांवरून भेद उत्पन्न होतात. या भेदांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावरून कोणालाहि कमी लेखूं नये अगर त्यांच्याबद्दल द्वेष, तिरस्कार बुद्धि किंवा तुच्छता बुद्धिहि वागवूं नये, या वृत्तीला सहिष्णुता हें नांव देतात. वर सांगितलेल्या अपमान, दुःख वगैरे गोष्टी सहन करण्याच्या

शक्तीला सोशिकपणा किंवा सहनशीलता हे शब्द लावतात. सहिष्णुतेचा वर दिलेला अर्थ घेऊन या प्रकरणांत थोडासा विचार करावयाचा आहे.

मनुष्याला स्वत:बद्दल व स्वत:शीं संबंध असलेल्या गोष्टींच्याबद्दल मोठा अभिमान असतो. मी शहाणा, माझें कुल श्रेष्ठ, माझी जात उच्च, माझा वर्ण शुद्ध असें त्याला वाटत असतें. इतर जाती, धर्म, देश इत्यादिकांबद्दल त्याला आदर वाटत नाहीं, एवढेंच नव्हे, तर पुष्कळदां त्यांच्याबद्दल त्याला नावड उत्पन्न होते, किंवा द्वेषसुद्धां वाटूं लागतो. जी गोष्ट जातीची, धर्माची किंवा देशाची, तीच राजकीय किंवा सामाजिक मतांची. इतर सगळ्या गोष्टी सारख्या असून नुसतीं मतें निराळीं असलेले लोक एकमेकांस पाण्यांत पहातात. कधीं कधीं तर शत्रूप्रमाणें लेखतात. त्यांच्या अंगीं सहिष्णुता नसल्यामुळें असें होतें

आपला देश अफाट आहे. अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक वंश व अगणित जाती त्यांत आहेत. त्यांच्यामध्यें एकोपा रहाण्यासाठीं सहिष्णुता पाहिजे. माझ्या देशाला आपला देश मानणारे सर्व लोक माझ्या देशाचीं लेकरें आहेत, त्या अर्थानें ते माझे देशबंधू आहेत, त्यांचा माझ्या देशावर माझ्या इतकाच हक्क आहे ही भावना प्रत्येकाच्या मनांत वागावयास हवी. थोड्याशा भेदावरून जर आपण एकमेकाशीं शत्रूंप्रमाणें वागूं तर देशांत अनर्थ माजेल.

धर्मभेद व पंथभेद यांमुळें आपल्या देशांत यापूर्वीं पुष्कळ वेळां लढाया झाल्या आहेत. इंग्रजांचें एकछत्री राज्य देशांत स्थापन झाल्यावरदेखील मधून मधून ठिकठिकाणीं या कारणानें दंगेधोपे झाले. यांच्या मुळाशीं माझें तें खरें, इतरांचें तें खोटें हा अभिमान होता.

अशिक्षित समाजांत असा अभिमान असल्यास आश्चर्य नाहीं. परंतु शिक्षणाच्या प्रसारानें या अभिमानाला मुरड पडली पाहिजे.

धर्म किंवा पंथ अनेक आहेत. परंतु सर्वांचा हेतू ईश्वरप्राप्ति हा एकच. त्याचप्रमाणें राजकीय किंवा सामाजिक मतें भिन्न असतील; परंतु सर्वांचा उद्देश एकच. देशाची किंवा समाजाची सुव्यवस्था. असें असतांना एका राजकीय किंवा सामाजिक पक्षाच्या लोकांनीं इतर पक्षांच्या लोकांना शत्रू लेखतां कामा नये किंवा त्यांच्याबद्दल अपशब्द वापरूं नयेत. धर्म, पंथ, प्रांत, भाषा व मतें यांबद्दलचा अभिमान योग्य मर्यादेंत ठेवण्याचा उपाय एकच, सहिष्णुता.

एखाद्याचा धर्म माझ्या धर्माहून वेगळा असेल. ईश्वरप्राप्तीचा त्याचा मार्ग वेगळा असेल. ईश्वराची भक्ति करण्याचा त्याचा मार्ग वेगळा असेल. पण तेवढ्यानें तो माझा शत्रू होत नाहीं. त्याचा ईश्वर माझ्या ईश्वराहून वेगळा नाहीं. अमक्याच मार्गानें माझी भक्ति करा, असें ईश्वरानें सांगितलेलें नाहीं. सगळ्या धर्मांची शिकवण पुष्कळ अंशीं सारखीच आहे. म्हणून आपल्या धर्माप्रमाणें आपण वागावें व दुसऱ्यांना त्यांच्या धर्माप्रमाणें वागूं द्यावें. दुसऱ्याच्या धर्मावर टीका करण्याचा मला अधिकार नाहीं. तसेंच जबरदस्तीनें भूल थापा देऊन किंवा आमिषें दाखवून दुसऱ्यांना माझा धर्म स्वीकारावयास मला लावायचें नाहीं. असें वागणें म्हणजे धार्मिक सहिष्णुता.

हाच नियम राजकीय किंवा सामाजिक मतांसंबंधानें आपण पाळला पाहिजे. धार्मिक मतें व राजकीय किंवा सामाजिक मतें यांमध्यें एका बाबतींत फरक आहे. दुसऱ्याच्या धर्मावर टीका करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. आपला हक्क एवढाच कीं माझ्या धर्माप्रमाणें मी वागत असतां दुसऱ्यानीं मला उपद्रव देऊं नये किंवा

माझ्यावर टीका करूं नये, उलट पक्षीं इतर धर्मांच्या लोकांना मी उपद्रव देऊं नये किंवा त्यांच्यावर टीका करूं नये. माझ्या धार्मिक मतांचा बरावाईट परिणाम इतरांवर कांहींच होत नाहीं. लोकशाही-मध्यें राजकीय किंवा सामाजिक मतें लोकांना पटवून द्यावीं लागतात. म्हणून इतरांच्या मतांवर टीका करण्याचा प्रसंग येतो. पण अशी टीका करितांनासुद्धां आपण तोल सांभाळला पाहिजे. विरुद्ध पक्षांच्या लोकांवर तोंडसुख घेऊं नये. त्यांच्यावर अप्रामाणिकपणाचा आरोप करितां कामा नये. माझीं मतें लोकांना पटवून द्यायचा अधिकार मला आहे, तसाच तो इतरांसहि आहे. मला माझ्या समाजाचें किंवा देशाचें हित साधावयाचें आहे. विरुद्ध पक्षांचा उद्देशहि तोच आहे. मग त्या पक्षांच्या लोकांवर स्वार्थाचा किंवा देशबुडवेपणाचा आरोप करणें कसें योग्य होईल? मतभेद असूनहि परस्परांविषयीं आदरबुद्धि कायम ठेविली पाहिजे. या वृत्तीला राजकीय किंवा सामाजिक सहिष्णुता म्हणावयाचें.

अशा सहिष्णुतेची आपल्याला फार गरज आहे. लोकशाही आपल्या देशांत अजून नवी आहे. विरुद्ध पक्षांच्या लोकांशीं कसें वागलें पाहिजे याबद्दलचे संकेत अजून ठरलेले नाहींत. त्यामुळें राज-कीय सभांतून स्वपक्षाचें समर्थन करून वक्ते थांबत नाहींत. ते दुसऱ्या पक्षांच्या लोकांवर कडक हल्ले चढवितात. त्यांना नाना तऱ्हेचीं नांवें ठेवतात. त्यांच्यावर अनेक तऱ्हेचे आरोप करितात. ही गोष्ट फार वाईट आहे. यामुळें पक्षापक्षांमध्यें द्वेषाची भावना उत्पन्न होते. कांहीं झालें तरी आपण एका देशाचे घटक आहोंत ही गोष्ट आपण विसरतों. दुसऱ्या पक्षांचे लोक जणूं काय देशाचे शत्रू आहेत असें आपण लोकांना भासवितों, कोणत्याहि रीतीनें त्यांना

नेस्तनाबूद केलें पाहिजे अशी भाषा वापरतों. अशा बोलण्यानें व वागण्यानें आपण लोकांमध्यें दुही माजवितों. दुसऱ्यांच्या विचारांतील दोष अवश्य दाखवावे. दुसऱ्यांच्या कामांतील चुकाहि अवश्य दाखवून द्याव्यात. परंतु त्यांच्याविरुद्ध जनतेला भडकावून देण्याचा प्रयत्न करूं नये, दुसऱ्या पक्षांतील लोकांबद्दल बोलतांना भाषा नेहमीं सौम्य वापरावी.

इतकें मुद्दाम लिहिण्याचें कारण एवढेंच कीं, आजकालच्या पक्षापक्षांच्या सभांतून बोलण्याचा तोल सांभाळला जात नाहीं. पुष्कळदां असभ्य भाषा वापरली जाते. कधीं कधीं तर शिमग्यांतल्या-प्रमाणें शिवराळपणा ऐकूं येतो. हल्लीं वर्षभर निवडणुकांचें सत्र चालूच असतें. त्यामुळें या शिवीगाळीला खळ पडत नाहीं. आज लहानमोठ्या गावांत किंवा लहान खेड्यापाड्यांत पहा. जिकडे तिकडे भांडणेंच भांडणें दिसतात. समजा, एका गोष्टींत मतभेद झाला, तेवढ्यानें इतर गोष्टींत सहकार्य करावयास अडचण असूं नये. पण तसें होत नाहीं. एका गोष्टींत मतभेद म्हणजे सर्वच बाबतींत मतभेद. एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें हटकून पश्चिमेस. लोकशाहीमध्यें प्रत्येकाला आपलें स्वतःचें मत बनविण्याची व तें बोलून दाखविण्याची मुभा आहे. पण याचा अर्थ असा नाहीं कीं एखाद्याशीं माझा एखाद्या मुद्यावर मतभेद झाला तर इतर बाबतींत मी व तो यांनीं दोघे मिळून काम करूं नये. राज्यामध्यें ठिकठिकाणीं अधिकारावर असलेल्या लोकांनीं या बाबतींत धडा घालून दिला पाहिजे. मतभेद नसलेल्या गोष्टींमध्यें त्यांनीं इतर पक्षांतील प्रमुख व्यक्तींची सल्ला घेतली पाहिजे. देश सर्वांचा आहे. निवडणुकींत अधिक मतें मिळवून सत्तेवर आलेल्या लोकांनीं इतर पक्षांतील लोकांच्या मताला

योग्य मान दिला पाहिजे. त्यांच्यावर अन्याय करितां कामा नये. किंवा स्वपक्षाच्या लोकांवर मेहेरबानी करण्यासाठीं इतर लोकांच्या न्याय्य हक्कांवर गदा आणूं नये. मतभेद असून सुद्धां देशाचा कारभार खेळीमेळीनें चालला पाहिजे. अशा वागण्यानें ऐक्याची भावना बळावेल. देशासाठीं वाटेल तो त्याग करण्यास लोक सिद्ध होतील. असें कोणासहि वाटतां कामा नये कीं माझ्या देशांत माझी उपेक्षा होत आहे, किंवा माझ्यावर अन्याय होत आहे. याप्रमाणें आपल्या देशांत परिस्थिति होण्याचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे. सहिष्णुतेचा.

### टीपा :

वृत्ति : मनाची ठेवण; मनाचा नेहमीचा कल.

पंथ : मार्ग; एकाच धर्माच्या लोकांमध्यें मतभेदामुळें झालेले गट; जसें हिंदूच्यामध्यें लिंगायत, आर्य समाजी, वारकरी वगैरे; जैनांमध्यें श्वेतांबर व दिगांबर; मुसलमानांमध्यें शिया व सुनी; खिस्ती लोकांमध्यें क्याथोलिक व प्रॉटेस्टंट.

सामाजिक : समाजाशीं किंवा समाजांत होणाऱ्या घडामोडींशीं संबंध असलेली.

वंश : मोठें कुटुंब किंवा जात. निरनिराळ्या परिस्थितीमुळें मनुष्यामध्यें ठळक भेद उत्पन्न झाले आहेत. एकाच रंगाच्या व चेहऱ्याची सारखीच ठेवण असलेल्या लोकांचा एक एक वंश समजला जातो. जसे आर्य, निग्रो वगैरे.

संकेत : सर्वसाधारण लोकमतानें ठरलेले नियम; यांना कायद्याचा आधार नसतो, पण लोकांची मान्यता असते.

समर्थन : आपलें मत किंवा कृत्य बरोबर आहे असें दाखविण्यासाठीं केलेला युक्तिवाद किंवा आणलेला पुरावा.

घटक : ज्याच्या योगानें पदार्थ बनतो तीं द्रव्यें; उदाहरणार्थ, पाणी ऑक्सिजन व हायड्रोजन या वायूंच्या संयोगानें बनतें. म्हणून हे दोन वायू पाण्याचे घटक. तसेंच ज्या कणांनीं एखादी वस्तू बनते ते कण, किंवा ज्या मनुष्यांनीं एखादा समाज बनतो, ते त्या वस्तूचे किंवा समाजाचे घटक.

न्याय्य : न्यायाला धरून असलेले; रास्त, योग्य.

ऐक्याची भावना : आपण सर्व एक आहों हा विचार.

उपेक्षा : हयगय, दुर्लक्ष, आबाळ.

♣ ♣ ♣

....८

# सतत उद्योग

उद्योगाच्या घरीं । रिद्धि सिद्धि पाणी भरी ॥

आपल्या भाषेंत एक म्हण आहे. 'उद्योगाचे घरीं । ऋद्धि सिद्धी पाणी भरी.' ऋद्धि म्हणजे सर्व चांगल्या वस्तूंचा भरपूर पुरवठा आणि सिद्धी म्हणजे हातीं घेतलेल्या कामांत यश. या म्हणीचा सरळ अर्थ असा होतो कीं, आवश्यक गोष्टी हव्या तेवढ्या मिळण्यासाठीं आणि हातीं घेतलेलीं कामें शेवटास जाण्यासाठीं उद्योग हा अचूक व उत्तम उपाय आहे. ही म्हण एकेका माणसाला तशीच सबंध राष्ट्राला लागू पडते. जरूर तेवढा उद्योग केल्याशिवाय आपल्याला हवी असलेली वस्तू केव्हांहि मिळणार नाहीं. तशी आशा धरून कोणीहि राहूं नये. सृष्टीचा नियम असा दिसतो कीं, हवेशिवाय इतर कोणतीहि वस्तू

आपल्याला बसल्या जागीं आयती मिळावयाची नाहीं. श्रम करा व पोट भरा; स्वस्थ बसा आणि उपाशी मरा. 'असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी' असें आपण कधीं कधीं ऐकतों. याचा अर्थ असा नाहीं कीं ईश्वर कोणाकोणाला घर बसल्या त्यांना पाहिजे तें देतो. हरी तुमचा असेल तर तुम्हाला हवें तें तो देईल. पण हरीला आपलासा करून घेणें ही गोष्ट सोपी नाहीं. ती मोठ्या कष्टाची गोष्ट आहे. म्हणून ही म्हणसुद्धां मनुष्याला उद्योगी होण्याचाच उपदेश करिते. संस्कृत भाषेंतली एक प्रसिद्ध म्हण काय सांगते ?

"न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः।"

निजून राहिलेल्या सिंहाच्या जबड्यांत सावजें (आपण होऊन) शिरत नाहींत. त्याला सुद्धां श्रम करावे लागतात. नुसती शक्ति असून उपयोग नाहीं. तिच्या बरोबर उद्योगहि पाहिजे.

हाच न्याय संबंध देशाला लावला पाहिजे. देशांतील लोक उद्योगी बनतील तर देशाची भरभराट होईल. तेच जर लोक आळशी असतील तर देश भिकारी होईल. या संबंधानें जर्मनी व जपान या देशांचें उदाहरण फार उपयोगी आहे. दुसऱ्या महायुद्धामध्यें या दोन्ही देशांचें अतोनात नुकसान झालें. त्यांचीं शहरें उध्वस्त झालीं, लाखों लोक मारले गेले. शेवटीं लाचार होऊन विरोधी राष्ट्रांना म्हणजे अमेरिका, इंग्लंड व रशिया यांस त्यांना बिनशर्त शरण जावें लागलें. लढाई थांबल्यानंतर त्या देशांतील पुष्कळशी यंत्र सामग्री व इतर संपत्ति विजयी राष्ट्रांनीं नुकसान भरपाईसाठीं हिरावून नेली; अशा स्थितींत त्यांचा धीर खचला असता, तर त्यांत नवल झालें नसतें. पण त्यांनीं धीर खचूं दिला नाहीं. देशांतील सर्व

लोकांनीं कष्ट करण्यासाठीं कंबरा बांधल्या. त्याचा परिणाम आपल्याला काय दिसतो ? जर्मनी आज पुन्हा भरभराटीच्या मार्गाला लागला आहे. आपल्या देशापेक्षां जर्मनी किती तरी लहान ! पण तो देश आपल्या देशाला कर्ज देण्याला समर्थ झाला आहे. उध्वस्त झालेलीं शहरें पुन्हा बांधलीं गेलीं आहेत. मोडलेले कारखाने पुन्हा उभारले गेले आहेत. हा कसला प्रताप ? ईश्वरानें त्यांच्यावर कांहीं विशेष कृपा केली का ? मुळींच नाहीं. हें केवळ त्यांच्या उद्योगाचें फळ. थोड्याशा कमी प्रमाणांत जपानची तीच गोष्ट आहे. त्या देशांतील दोन शहरांवर तर ॲटम बॉम्ब पडले व तीं बेचिराख झालीं. मधून मधून भूकंपांनीं त्या देशाचें खूप नुकसान केलें. तरीहि तो देश औद्योगिक बाबतींत आपल्या देशाशीं बरोबरीच्या नात्यानें व्यापारी तह करण्यास तयार झाला आहे. आणि हें सर्व या दोन्ही देशांनीं चौदा पंधरा वर्षांत घडवून आणलें आहे.

आपल्या देशाला देवानें पुष्कळ संपत्ति दिली आहे. पण तिचा योग्य उपयोग करण्यास आपण शिकलें व झटलें पाहिजे. नुसती जमीन सुपीक असून काय उपयोग ? तिची मशागतहि उत्तम झाली पाहिजे. मग ती आपल्याला अपेक्षेप्रमाणें किंवा अपेक्षेहून अधिक देखील पीक देईल. आपले पूर्वज अतिशय उद्योगी व कष्ट घेणारे असे होते. म्हणून आपला देश पूर्वीं फार सधन होता. हिंदुस्तानांत सोन्याचा धूर निघतो असें इतर देशांतील लोक म्हणत. पण आज काय स्थिति आहे ? हल्लीं धूर निघतो तो सोन्याचा नाहीं, तर गोंवऱ्यांचा ! पृथ्वीच्या पाठीवर मागासलेले पुष्कळसे देश आहेत. त्यांमध्यें आपल्या देशाचें स्थान आहे ! तें सोडून देऊन आपल्याला पुढारलेल्या देशांमध्यें स्थान मिळवावयाचें आहे. त्यासाठीं आपण

पुष्कळच श्रम करावयास हवे. या दृष्टीनेंच आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात "आराम हराम है."

आणि हें अगदीं सत्य आहे. कारण आराम कोणी व केव्हां करावयाचा? आपलें काम अगदीं चांगल्या रीतीनें पार पडल्यानंतर पुन्हां जोमानें नवीन काम करण्यास उत्साह यावा म्हणून आराम करायचा. ज्याचें काम अर्धवट राहिलें आहे अशा मनुष्यास आराम करण्याचा मुळींच अधिकार नाहीं. आपल्या देशापुढें सध्यां अनेक अडचणी आहेत. अन्नधान्याचा तुटवडा आहे. यंत्रें बाहेर देशाहून आणावीं लागत आहेत. लष्करी सामग्रीसाठीं आपण पुष्कळसे दुसऱ्या देशांवर अवलंबून आहोंत. शास्त्रीय शोधास आपण नुकताच आरंभ केला आहे. अशा अवस्थेंत आराम करणें हराम म्हणजे पापच आहे. देशांतील प्रत्येक माणसानें आळस झाडून कामास लागलें पाहिजे. तेव्हांच या अवस्थेंतून आपण बाहे पडूं शकूं. शेतकऱ्यांनीं जास्तींत-जास्त पीक काढलें पाहिजे. विणकऱ्यांनीं जास्तींत जास्त व चांगल्यांत चांगलें कापड विणलें पाहिजे. इतर धंद्यांतील लोकांनीं आपल्या कष्टांची कमाल केली पाहिजे. शास्त्रीय संशोधकांनीं चिकाटीनें आपले शोध चालू ठेवले पाहिजेत. प्रत्यक्ष उत्पन्न करणाऱ्यांची ही गोष्ट. जे प्रत्यक्ष उत्पादन करीत नाहींत अशा लोकांनींहि आराम करणें हराम होईल. राज्यकारभार चालविणारांनीं म्हणजे पंतप्रधानापासून तों कारकून चपराश्यापर्यंत प्रत्येकानें आपलें काम कसून व मन लावून केलें पाहिजे. तोच नियम रेल्वे व बँकांतील कर्मचारी व शिक्षक यांनीं पाळला पाहिजे. हे लोक माल प्रत्यक्ष उत्पन्न करीत नाहींत. तथापि त्यांच्या कामाचा सुद्धां उत्पादनावर अप्रत्यक्षपणें फार परिणाम होतो. पैशाचे व्यवहार चोख व सत्वर झाले म्हणजे व्यापारी

व कारखानदार यांचें काम सुकर होतें. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना नीट शिकविलें व शिस्त लावली तर त्यांच्या मनांत देशाविषयीं प्रेम व कर्तव्यबुद्धि निर्माण होईल. आगगाड्या चालविणारांनीं आपलें काम प्रामाणिकपणें करून प्रत्यक्ष उत्पादन करणारांस मदत केली पाहिजे. अशा रीतीनें प्रत्येक माणसानें आपलें काम निरलसपणें ( आळस न करितां ) केलें पाहिजे. काम करण्यासाठीं दोन शाबूत हात असणाऱ्या प्रत्येक माणसानें कांहीं काम करीत राहिलें पाहिजे. माझ्या बापानें पुष्कळशी जिंदगी मिळवून ठेविली आहे, मी तिचा उपभोग स्वस्थ बसून घेईन असें म्हणणें योग्य नाहीं. असें म्हणणारा आपल्या कर्तव्यांत चुकारपणा करितो. आपल्याला आपल्या देशाचा उत्कर्ष साधावयाचा आहे, व तो स्वतःच्याच प्रयत्नानें साधणार आहे. गीतेनें आपल्यास शिकविलें आहे. 'उद्धरेदात्मनात्मानम्.' आपला उद्धार स्वतःच्या बळानें करावा. दुसरे कोणी येऊन आपल्या अडचणी दूर करितील अशी आशा करणें व्यर्थ आहे. समर्थ रामदास-स्वामी म्हणतात

" जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला । "

याप्रमाणें देशाचा उत्कर्ष साधण्याच्या कामांत उद्योगीपणाला फार महत्त्वाचें स्थान आहे. पण आपण लोकांच्या मनाचा कल पाहूं गेलों तर खेद वाटल्यावाचून रहात नाहीं. कामकऱ्यांमध्यें काय, किंवा कर्मचाऱ्यांमध्यें काय; शक्य तितकें कमी काम करून शक्य तेवढा जास्त मोबदला मिळावा यासाठीं धडपड चाललेली दिसते. देशांतील सर्वांत मोठा धंदा शेतीचा. पण शेतीमध्यें खपणारे लोक पहिल्या इतका वेळ शेतांत काम करीत नाहींत, जे काम करितात तेंहि मन

लावून करीत नाहींत ही ओरड सगळीकडेच ऐकूं येते. उद्योगधंद्यांत पाहिलें तर वेतनवाढींसाठीं संप किंवा सत्याग्रह कोठें ना कोठें चालू असतो. त्यामुळें हजारों कारागीर दिवसानुदिवस रिकामे बसून राहातात व उत्पादन त्या मानानें घटत जातें. रेल्वे, बँका व पोस्ट यांमधील कर्मचारी व शाळांचे शिक्षक यांच्या समित्यांचें (यूनिअन्सचें) ध्येय पगारवाढ व नोकरीमध्यें सवलती पदरांत पाडून घेण्यापलीकडे कांहीं दिसत नाहीं. इतर देशांतील कामकऱ्यांच्या बरोबरीनें आपण काम केलें पाहिजे हें कोणाच्या गांवींहि नसतें. जपानचा गिरणी-कामगार हिंदी गिरणीकामगारांच्या दुप्पट किंवहुना चौपट काम करितो. आपल्या कामगारांनीं तितकें काम कां करूं नये याचा विचार या समित्या करीत नाहींत. काम बंद पाडलें तर कारखान्यांच्या मालकांचें आपण नुकसान करितों, पण त्याबरोबरच उत्पादनांत खंड पाडून आपण देशाचें किती तरी नुकसान करितों याची पर्वा काम-करी किंवा त्यांचे पुढारी करीत नाहींत. शिक्षकांचें वेतन व समाजांतील दर्जा यांमध्यें वाढ व्हावी म्हणून खटपट करणारे त्यांचे पुढारी शिक्षकांची लायकी व कळकळ वाढली पाहिजे, ती खालावल्या-मुळें देशाचें अतोनात नुकसान होत आहे या गोष्टीकडे मुळींच लक्ष देत नाहींत. सरकारी खात्यांतील नोकरांबद्दल तर विचारावयासच नको. सरकारी नोकरी म्हणजे जनतेला पिळून काढावयाचा मक्ता असें समजणारे त्यांच्यांत फार. या सर्व प्रकारांमुळें सतत उद्योग करण्याशिवाय देशाला तरणोपाय नाहीं हें सत्य नजरेआड होतें.

म्हणून सर्व रहिवाश्यांना देशाचें आवाहन आहे कीं, बाबानों राष्ट्राला वैभव प्राप्त करून देण्यासाठीं उद्योगाची कांस धरा. प्रत्येकानें कांहीं ना कांहीं काम केलें पाहिजे व तें कसून केलें पाहिजे.

अंगमेहनतीची थोरवी नुसती कागदावर किंवा कवितेंत राहूं देऊं नका, ती आपल्या कृतीनें सिद्ध करा. देशोन्नतीचा गोवर्धन पर्वत उचलण्यासाठीं प्रत्येकानें त्याला खांदा लावला पाहिजे. तो सांवरून धरण्यासाठीं कोणी कृष्णभगवान् धावून येणार नाहीं किंवा कोणी अवतारी पुरुष चमत्कार करणार नाहीं.

एका आणीबाणीच्या समुद्रांतील लढाईच्या अगोदर प्रसिद्ध इंग्रज दर्यासारंग नेल्सन यानें सर्व नौका दलास संदेश दिला, 'प्रत्येक मनुष्य आपलें कर्तव्य करील अशी इंग्लंडची अपेक्षा आहे.' या संदेशानें सर्व लढवय्यांना स्फुरण चढलें, व त्यांनीं पराक्रमाची शिकस्त करून शत्रूला नामोहरम केलें. आपला देशहि आज एका आणी-बाणीच्या अवस्थेंत आहे. तेव्हां प्रत्येक भारतीय सतत उद्योग करून आपलें कर्तव्य चोखपणें पार पाडील अशी अपेक्षा आपला देश करीत आहे. ही त्याची अपेक्षा आपल्या मनांत नेहमीं जागृत राहील का?

## टीपा:

सृष्टि: (ईश्वरानें) उत्पन्न केलेलें जग.

दुसरें महायुद्ध: गेल्या पन्नास वर्षांत दोन युद्धें झालीं. पहिलें महायुद्ध सन १९१४ ते १९१८ पर्यंत झालें. जर्मनीचा बादशहा केसर विल्यम यानें फ्रान्स विरूद्ध युद्ध पुकारलें. फ्रान्सच्या मदतीस प्रथम इंग्लंड, पुढें रशिया, जपान, अमेरिका वगैरे देश आले. जर्मनीचा पराभव झाला व केसरशाहीचा अंत झाला. पुढें दहापंधरा वर्षांनीं हिटलरनें जर्मनीमध्यें नात्सी पक्षाची स्थापना करून आपली सत्ता स्थापन केली. सैन्य व विमानदळ प्रबळ करून त्यानें सर्व जगावर आपला अमंल बसविण्याची महत्त्वाकांक्षा मनांत धरली. त्यानें फ्रान्स, इंग्लंड व रशिया यांचें विरूद्ध सन १९३८ सालीं युद्ध पुकारलें. प्रथम त्याला फार मोठे जय मिळाले. जपान व इटाली हे देशहि त्याला येऊन मिळाले.

परंतु अमेरिकेच्या मदतीनें इंग्लंड व रशिया यांनीं त्याचा पूर्ण पराजय केला. शत्रूंच्या हातीं पडूं नये म्हणून हिटलरनें आत्महत्त्या केली. हें युद्ध १९४५ सालीं संपलें.

अप्रत्यक्षपणें : उघड दिसणार नाहीं अशा रीतीनें; आडवळणानें; दूरच्या संबंधानें; उदाहरणार्थ, दुसऱ्याच्या चिथावणीनें एखाद्यानें खून केला, तर तो प्रत्यक्ष खून करणारा, व चिथावणी देणारा अप्रत्यक्षपणें खून करणारा.

ध्येय.: साधावयाचें म्हणून मनांत धरलेलें काम, उद्देश.

कर्तव्यबुद्धि : जें करण्याचा आपल्यावर भार आहे तें काम आपण केलेंच पाहिजे ही जाणीव.

गोवर्धन : श्रीकृष्ण व त्याचे सोबती गाई चारीत असतां एकदम मुसळधार पाऊस पडूं लागला. त्या पावसापासून बचाव करण्याकरितां श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून त्याच्या खालीं सर्व गाई व गवळी यांस आसरा दिला अशी कथा पुराणांत आहे. यावरून गोवर्धन उचलणें म्हणजे एखादें फार कठीण व श्रमाचें अचाट काम हातीं घेणें असा अर्थ निघाला.

संदेश : निरोप; कोणाच्या हातीं पाठविलेली सूचना.

नेल्सन : यानें इ. स. १८०० च्या सुमारास ट्रफलगारच्या लढाईत फ्रान्स देशाच्या आरमाराचा फडशा पाडला. त्यामुळें इंग्लंड देशावर स्वारी करण्याचें नेपोलिअन बोनापार्टचे बेत जागच्या जागीं राहिले.

नामोहरम : चीत, पराभूत.

♣ ♣ ♣

....९

# उपसंहार

मित्रहो ! आपला देश भरभराटीस यावा, त्याचें स्वातंत्र्य कायम राहावें, त्याला जगांत प्रतिष्ठा मिळावी, असें आपण सर्वजण इच्छितों. हें होण्यासाठीं आपण कसें वागलें पाहिजे याची चर्चा मागील प्रकरणांत केली आहे. त्यांमध्यें कांहीं मोठीं तत्त्वें सांगितलेलीं आहेत असें नाहीं. सर्व साध्यासुध्या गोष्टीच आहेत. या साध्यासुध्या गोष्टी पुष्कळदां मनाला पटतात, मात्र आचरणांत दिसून येत नाहींत. म्हणून त्या पुन्हा पुन्हा सांगाव्याशा वाटतात. देशप्रेम, सचोटी, सहिष्णुता, सहकार वगैरे गोष्टी थोड्याबहुत प्रमाणांत तरी आपल्या रोजच्या वागणुकींत दिसावयास पाहिजेत. गीतेंत कर्मयोगासंबंधानें म्हटलें आहे,

" स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।"

हा धर्म थोडासासुद्धां पाळला असतां मोठ्या संकटापासून बचाव



ग्रंथालय दा. क. ९२५२४

करितो. त्याप्रमाणें ह्या गोष्टींच्याबद्दल म्हणतां येईल. मुख्य मुद्दा हा कीं आपल्या देशाचें बरेवाईट आपल्याच म्हणजे माझ्या तुमच्यासारख्या साधारण माणसांच्या हातीं आहे. जें आपल्याजवळ आहे तें राखण्याकरितां व जें पाहिजे तें मिळविण्याकरितां आपण कसें वागलें पाहिजे याचा विचार प्रत्येकानें आपल्या मनाशीं करावा. असा विचार करून जें आपल्यास समजलें, तें स्वत: आचरावें व दुसऱ्यांस समजावून द्यावें. हा हेतू डोळ्यापुढें ठेवून हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे. यांतले विचार वाचकांस पसंत पडतील व त्यांचें प्रतिबिंब वाचकांच्या रोजच्या वागण्यांत थोडें बहुत तरी दिसेल अशी आशा करितों.

दा. क्र. १२३८९

**भारत माता की जय !**

**टीपा**

उपसंहार : एखाद्या चर्चेचा समारोप किंवा थोडक्यांत आढावा.

गीता : भगवद्गीता. ही श्रीकृष्णानें अर्जुनास सांगून त्याच्या मनाचा झालेला गोंधळ दूर केला. प्रत्येकानें आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. तें करितांना जवळच्या नातेवाईकांशीं कठोरपणानें वागावें लागलें, किंबहुना युद्धदेखील करावें लागलें तरी तें करून कर्तव्य पार पाडावें असें श्रीकृष्णानें अर्जुनाला समजावून दिलें. तेव्हां तो कौरवांशीं युद्ध करण्यास तयार झाला.

कर्मयोग : आपलें कर्तव्य नीट रीतीनें फलाची आशा न धरितां करून ईश्वरप्राप्ति करून घेण्याचा मार्ग. या शिवाय ज्ञान व भक्ति हे दोन मार्ग आहेत. परंतु सर्वसाधारण मनुष्यांस झेपण्यासारखा व पटण्यासारखा कर्मयोग हाच मार्ग आहे. तो सर्वांस समजावून देण्यासाठींच श्रीकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली, असें लोकमान्य टिळकांनीं आपल्या सुप्रसिद्ध गीतारहस्य ग्रंथांत प्रतिपादिलें आहे.

**समाप्त**



५५५०२ २०५८ १९।३।७

REFBK-0012325

यांप्रमाणेंच
इतर वाचनीय पुस्तकें

**बालसुहृद** (तिसरी आवृत्ति)
गो. रा. चोळकर २·००

**तरुणसुहृद** (छापत आहे)
गो. रा. चोळकर

**गोष्टीरूप बालवीर नियम**
द्वा. वि. केळकर १·००

**आमचे नेताजी**
दा. वि. कुलकर्णी १·००

**अलौकिक अभियोग**
वनस्पति व मानव यांच्यामधील अभियोगाची (खटल्याची) रंजक कथा —'गलिव्हरचे प्रवास' यांप्रमाणेंच—
आपटे गुरुजी २·००

**यशस्वी जीवन**
भगवान नाईक ३·००

**वेडगांवचे शहाणे**
डॉ. गो. के. भट ३·००

या व इतर सर्व प्रकारच्या वाङ्मयीन गरजेसाठीं.

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार**
महाद्वार रस्ता, कोल्हापूर